


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १५ • अंक ३५२ • बुधवार, दि. १ जूलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### सचिन अहिर विधान परिषदेच्या उपसभापती पदी



मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेतील उपसभापती पदासाठी आज निवडणूक झाली. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सचिन अहिर यांची एकमताने निवड करण्यात आली. उपसभापती पदासाठीच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे सचिन अहिर आणि महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे जगन्नाथ अभ्यंकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. विधान परिषदेतील आकडेवारी पाहता महायुतीचे एकतर्फी विजय झाला असता. परंतु तरी देखील मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांना दाखल केलेला उमेदवारी अर्जाचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

---

### व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात कपात!

नवी दिल्ली : व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरात मोठी कपात करण्यात आली आहे. १९ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात १८३.५० रुपयांची कपात करण्याचा निर्णय पेट्रोलियम कंपन्यांनी घेतला आहे. तर पाच किलोच्या लहान गॅस सिलिंडरच्या दरातही १३ रुपयांची कपात करण्यात आली आहे. त्यामुळे १९ किलो आणि ५ किलोच्या सिलिंडरची राजधानी दिल्लीलीत किंमत अनुक्रमे २९३० रुपये आणि ८०८.५० रुपयांवर पोहोचली आहे. बुधवारी सकाळपासून नवे दर लागू झाले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरात सातत्याने वाढ होताना दिसत होती.

# भाजप हा पत्त्यांच्या बंगल्यासारखा!

## खालचा पत्ता नरेंद्र मोदींचा | तो सटकला की सर्व कोसळणार

प्रतिनिधी दि. १ जूलै

भाजपा हा पत्त्याच्या बंगल्यासारखा आहे. याचा जो खालचा पत्ता आहे तो नरेंद्र मोदींचा आहे. तो एकदा सटकला तर सगळे कोसळणार आहे. जे काही आज टिकून आहे ते नरेंद्र मोदींवर टिकून आहे. हे बाकीच्यांवर नाही. अशा गोष्टींमध्ये तुम्ही जे भयानक राजकारण खेळताहेत हे त्यांच्याही अंगलट येणार आहे, अशी प्रखर टीका मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आजच्या फोडाफोडीच्या राजकारणावर केली. ठाण्यात आज झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते ज्या-ज्या वेळी सत्ताधाऱ्यांनी आपला विरोधक संपवला आहे. तेव्हा त्यांच्यातच विरोधक तयार झालेले आहेत आणि त्यांनी त्यांनाच संपवले आहे. ही प्रक्रिया भाजपात सुरू झाली आहे. त्यामुळे बाहेरचे विरोधी पक्ष तुम्ही संपवणे हे सोडून द्या. पण आज तुमच्यात जे विरोधक निर्माण झालेत यातून तुम्हाला जो त्रास होईल तो तुम्ही बघत राहा. समोरचे विरोधक तुम्ही संपवले तेव्हा तुमच्यातच विरोधक तयार होतात. हा जगाचा इतिहास आहे. आणीबाणीच्या काळात हे झाले होते. अनेक वेळा याच गोष्टी घडल्या आहेत असा दावाही राज

### अमित शाहांवरही साधला निशाणा

» हे सगळं अमित शाहांचे राजकारण सुरू आहे. शिवसेनेचे ६ खासदार फोडले ते भाजपात का गेले नाही? टीएमसीचे २२ खासदार फुटले त्यांचा वेगळा गट का तयार केला..उद्या मला पंतप्रधानपदावर दावा करायचा असेल तेव्हा मला आतून विरोध झाला तेव्हा हे लोक बाहेरून मला पाठिंबा देतील. जर दुसऱ्या कुणी दावा सांगितला तर मी जे लोक उभे केले आहेत त्यातले कुणी पाठिंबा देणार नाही. समोरचे विरोधक संपवता तेव्हा विरोधक तुमच्यातच तयार होतात. हे चित्र महाराष्ट्रात आणि देशात तुम्हाला दिसेल. अगदी खालपर्यंत दिसेल. बेधुंद सत्ता येते तेव्हा माणसं अशी वागायला लागतात असं सांगत राज ठाकरे यांनी अमित शाहांवर निशाणा साधला.

### देहविक्रीला हे तयार असतील तर..

» महाराष्ट्रात जे फोडाफोडीचं गलिच्छ आहे. हे चांगले राजकारण अशा गोष्टींचा भाजपालाही त्रास होईल काय करतोय, कुठपर्यंत जातोय याला नाही? प्रश्न विकत घेणाऱ्यांचा नाही, विकले देहविक्रीला हे तयार असतील तर गिऱ्हाईक राजकारण आहे. लोकांमध्ये या गोष्टीचा संताप उन्हातान्हात उभे राहायचे मतदान करायचे, हे काही चांगले राजकारण नाही अशी टीका त्यांनी केली.

राजकारण होतंय हे खूप नव्हे. उद्या सत्ता गेल्यावर तेव्हा काय कराल? आपण काही मर्यादा आहेत की जाणाऱ्यांचा आहे. आहेतच. हे घाणेरडे आहे. लोकांनी



### आपण देश कुठे नेणार आहोत?

महाराष्ट्रात ३ वर्षांनी निवडणुका आहेत. आता ही एसआयआर प्रक्रिया राबवणार, दरवर्षी मुले १८ वर्षांची होत असतात. अनेक माणसे घरे बदलतात. त्यामुळे ही प्रक्रिया थांबवून चालणार नाही तर सुरूच ठेवावी लागेल. एसआयआर प्रक्रियेचा सर्वात मोठा फटका पश्चिम बंगालला, बिहारला बसला. ममता बॅनर्जी यांच्यासारख्या माजी मुख्यमंत्र्यांचा पराभव होतो. हे जे काही घाणेरडे राजकारण सुरू आहे त्याचा फटका भविष्यात भाजपालाही बसणार आहे.

# मनपाच्या 21 नगरसेवकांवर टांगती तलवार

प्रतिनिधी दि. १ जूलै

**अकोला** : अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मधील राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या विजयी उमेदवारांसाठी निवडणूक विभागाकडून एक महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. नियमांनुसार, राखीव जागेवरून निवडणूक जिंकलेल्या उमेदवारांना निकाल लागल्यापासून ६ महिन्यांच्या आत जात पडताळणी समितीकडून प्रमाणित केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते.

या ६ महिन्यांची मुदत येत्या १५ जुलै रोजी संपत आहे. अकोला महानगरपालिका निवडणुकीत राखीव प्रवर्गातून एकूण ३७ उमेदवार विजयी झाले होते. यामध्ये अनुसूचित जातीचे (एण्) १४, अनुसूचित जमातीचे (एऊ) २ आणि इतर मागासवर्गीय (धॅुण्) प्रवर्गातील २१ उमेदवारांचा समावेश होता. मात्र, या ३७ पैकी आतापर्यंत केवळ १६ विजयी उमेदवारांनीच आपली प्रमाणपत्रे निवडणूक विभागाकडे जमा केली आहेत. यामध्ये अनुसूचित जातीमधील ६, अनुसूचित जमातीमधील १ आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील ९ उमेदवारांचा समावेश आहे.

उर्वरित २१ विजयी उमेदवारांनी अद्याप आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. निवडणूक विभागाकडून या उमेदवारांना वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क करण्यात आला असून लेखी सूचनाही पाठवण्यात आल्या आहेत. १५ जुलैपर्यंत ज्या उमेदवारांची प्रमाणपत्रे मिळणार नाहीत, अशा उमेदवारांचा सविस्तर अहवाल पुढील कायदेशीर आणि शिस्तभंगविषयक कारवाईसाठी थेट 'राज्य निवडणूक आयोगाकडे' पाठवला जाईल, असा इशारा संबंधित अधिकाऱ्यांनी दिला आहे.

### त्वरीत सादर करावे अन्यथा..

» या १५ जुलैला या ६ महिन्यांचा कालावधी पूर्ण होत असून, अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राखीव प्रवर्गातून ज्यामध्ये अनुसूचित जातीमधून १४, अनुसूचित जमातीमधून २ आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातून २१, अशा एकूण ३७ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. त्यामधून अद्यापपर्यंत आम्हाला अनुसूचित जातीमधील ६, अनुसूचित जमातीमधील १ आणि इतर मागासवर्ग प्रवर्ग यामधील ९ अशा एकूण १६ विजयी उमेदवारांनी जात पडताळणी अहवाल आणि त्याबाबतचे प्रमाणपत्र निवडणूक विभागाकडे सादर केलेले आहेत.अद्यापभी २१ निवडणूक जिंकलेल्या उमेदवारांनी त्यांचं जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेलं नाही.

- अनिल बिडवे, निवडणूक अधिकारी,मनपा,अकोला.

# नगरसेविकेच्या पतीची अकोल्यात तर, बार्शीटाकळी तालुक्यात युवकाची हत्या

प्रतिनिधी दि. १ जूलै

**अकोला** : मंगळवारी दोघांची हत्या करण्यात आल्याने जिल्हा हादरला. अकोल्यात जुने शहरातील प्रभाग क्रमांक १७ च्या नगरसेविका यांचे पती याकूब खान यांच्यावर स्टेशन रोडवर जिजाऊ हॉलसमोर प्राणघातक हल्ला झाला होता. उपचारा दरम्यान मंगळवारी सायंकाळी त्यांचा मृत्यू झाला. तर दुसरी घटना बार्शीटाकळी तालुक्यात निंबी येथे शेतीच्या वादातून युवकाची हत्या झाली. रात्री ही घटना घडली. जुना शहर भागातील प्रभाग क्रमांक १७ च्या काँग्रेस नगरसेविका



रफियाबी यांचे पती याकूब खान यांच्यावर न्यायालयाच्या समोर जिजाऊ हॉलजवळ काही अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केला. खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वी जुना शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पोळा चौक परिसरात आरोपींसोबत त्यांचा वाद झाला होता. त्याच वादाचा वचपा काढण्यासाठी हा हल्ला झाल्याची माहिती मिळत आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या याकूब खान यांना प्रथम सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने नातेवाईकांच्या मागणीवरून त्यांना आयकॉन रुग्णालयात रेफर करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच याकूब खान यांच्या समर्थकांनी आणि नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात प्रचंड गर्दी केली होती.

दरम्यान, काही पोलीस कर्मचारी लॉकअपमधून आरोपींना न्यायालयात हजर करण्यासाठी

# जीएमसीच्या नवनियुक्त प्रशासकीय अधिकारी आरती जगताप अपघातात ठार

## कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी दि. १ जूलै

**अकोला** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या नवनियुक्त प्रशासकीय अधिकारी आरती जगताप यांचे समृद्धी महामार्गावर धामणगावजवळ झालेल्या भीषण अपघातात निधन झाले. या अपघातात त्यांच्या कुटुंबातील आणखी चार सदस्यांचाही मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

आरती जगताप यांनी नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने प्रशासकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. शासनाने त्यांची अकोला येथील जीएमसीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नियुक्ती केली होती.



त्यांनी २७ जून रोजी नव्या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. सेवेला दोनच दिवस झाले असताना रविवारी कर्तव्यावर येण्यासाठी अकोल्याकडे परत येत असताना समृद्धी महामार्गावर धामणगावजवळ त्यांच्या वाहनाला कंटेनरची जोरदार धडक बसली.

या भीषण अपघातात आरती जगताप यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील चार सदस्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नव्या जबाबदारीची स्वप्ने डोळ्यांत घेऊन सेवेला सुरुवात केलेल्या अधिकाऱ्याचा असा अकाली अंत झाल्याची बातमी समजताच जीएमसी व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील अधिकारी, डॉक्टर आणि कर्मचारीवर्गावर शोककळा पसरली.

नव्याने रुजू झालेल्या सहकाऱ्याला इतक्या अल्पावधीत गमावल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला. सोमवारी (२९ जून) जीएमसीमध्ये आयोजित शोकसभेत वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व सहकाऱ्यांनी आरती जगताप यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### ठाकरेंचा विधान परिषदेतील आणखी एक आमदार गळाला!

**मुंबई** : आमदार सचिन अहिर यांच्या शिंदे शिवसेनेतील प्रवेशानंतर आता आणखी एक विधान परिषद आमदार गळाला लावण्याची शिंदे शिवसेनेची तयारी सुरु असल्याची माहिती मिळत आहे. ठाकरेंच्या उर्वरित विधानपरिषदेतील पाच आमदारांपैकी सुनील शिंदे हे शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडून आले आहेत. त्यामुळे सुनील शिंदे यांना सोबत घेण्याचा प्रयत्न शिंदे शिवसेनेकडून केला जात असल्याचे सूत्रांची माहिती आहे. सुनील शिंदे हे २०२१ मध्ये विधान परिषद आमदार झाले. यावेळी सुद्धा दोन्ही शिवसेना एकत्र होत्या. सुनील शिंदे हे शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडून आले आहेत.

# अखेर 'एनएचएम'च्या 15 हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांचा सेवा समायोजनाचा मार्ग मोकळा!

## 1,153 कोटींच्या खर्चास हिरवा कंदील

प्रतिनिधी दि. १ जूलै

**यवतमाळ** : राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या १५ हजार १० कंत्राटी कार्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून, यासाठी वार्षिक १ हजार १५३.६० कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण



मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर हा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यापूर्वी १४ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेतला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यात सुधारणा करण्यात आली होती. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या आंतरविभागीय समितीच्या शिफारशी आणि २५ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. शासन निर्णयानुसार, २५ जूनपर्यंत २०२६ तांत्रिक खंड वगळता सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या १५,०१० कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामविकास विभागातील नियमित मंजूर पदांशी संबंधित कंत्राटी पदांची समकक्षता निश्चित केली जाणार असून, आवश्यकतेनुसार इतर विभागांतील समकक्ष पदांचाही विचार केला जाणार आहे.

# शिक्षणाच्या आईचा घो...; विद्यार्थी म्हणणार आता 'निंबुडा.. निंबुडा..!

## ओडीशामधील प्रकार : कवितेच्या जागी चक्क ऐश्वर्याचे गाणे!

प्रतिनिधी दि. १ जूलै

**भुवनेश्वर** : ओडिशामध्ये इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकात अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनवर चित्रित झालेल्या 'निंबुडा-निंबुडा' या गाण्याचे लिरिक्स छापल्याचे आढळले आहे. १९९९ मधील 'हम दिल दे चुके सनम' या सुपरहिट चित्रपटातील या प्रसिद्ध गाण्याचे लिरिक्स इयत्ता ५ वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकात चुकून छापले गेले आहेत. शाळांमध्ये ही नवीन पाठ्यपुस्तके पोहोचल्यानंतर संपादकीय प्रक्रिया आणि गुणवत्ता नियंत्रणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

'ओडिशा टीव्ही'च्या वृत्तानुसार, इयत्ता ५ वीच्या पाठ्यपुस्तकातले या गाण्याचे फोटो ऑनलाइन व्हायरल झाल्यानंतर ही चूक उघडकीस आली; शाळेतील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या पुस्तकात सदर गाण्याचे लिरिक्स छापलेले असल्याचे त्यातून दिसून आले. या घटनेमुळे ओडिशातील शालेय पाठ्यपुस्तकांमधील त्रुटींबाबत नवा वाद निर्माण झाला असून, सोशल मीडियावरही या चुकीबद्दल तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

या चुकीमुळे शालेय पाठ्यपुस्तक बनवणं, पुनरावलोकन आणि छपाईदरम्यान वापरल्या जाणाऱ्या गुणवत्ता नियंत्रण उपायांबद्दल चिंता निर्माण झाली आहे. शिक्षण तज्ज्ञ आणि पालकांनी, एडिटींगच्या अनेक टप्प्यांमधून जाऊनही एवढी मोठी चूक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यापूर्वी कशी राहून गेली, असा प्रश्न उपस्थित केला आहे.



### अधिकाऱ्यांना केले निलंबित

» ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी 'शिक्षक शिक्षण आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद'चे माजी संचालक मनोज पाढी आणि तीन सहाय्यक संचालकांना निलंबित केले आहे. एका अधिकृत निवेदनानुसार, विकास आयुक्त डी. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली; या समितीने पुस्तके तयार करण्यातील त्रुटींची चौकशी केली होती.

### पाठ्यपुस्तकांमध्ये १६०० हून अधिक चुका

» ओडिशामध्ये शाळकरी मुलांच्या पाठ्यपुस्तकांमधील चुकांबाबत चिंता व्यक्त होण्याची ही पहिलीच वेळ नाही. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' अंतर्गत राज्यात वितरित करण्यात येत असलेल्या नवीन पाठ्यपुस्तकांमध्ये १६०० हून अधिक चुका आढळून आल्या आहेत. इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या 'एससीईआरटी'च्या ५५ नवीन पाठ्यपुस्तकांमध्ये एकूण १६७८ चुका सापडल्या. विशेष म्हणजे ८ वीच्या पाठ्यपुस्तकात सर्वाधिक म्हणजे ७०५ चुका आढळल्या आहेत.

### तुमच्या रेशनची आम्हाला गरज नाही..

**रावळकोट** : पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानी सरकारविरोधातील आंदोलने तीव्र झाली आहेत. पीओके हा पाकिस्तानचा भाग नाही, अशी घोषणा करत रावळकोट येथील ईदगाह मैदानावर हजारो लोक जमले.

या आंदोलनाचे नेतृत्व जम्मू आणि काश्मीर आवामी ॲक्शन कमिटी (जेएएसी) करत आहे. जेएएसीचे प्रमुख नेते शौकत नवाज मीर यांना धीरकोटच्या संगर फत्तारे भागातून त्यांच्या दोन साथीदारांसह अटक करण्यात आली. पीओकेमध्ये जेएएसीचे ६०० हून अधिक नेते आणि कार्यकर्त्यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.



# पहिल्याच पावसात अकोट-दर्यापूर मार्गाची पोलखोल

वि. प्रतिनिधी १ जुलै

अकोट–दर्यापूर मार्गावरील रंभापूर फाट्याजवळून ते अकोट नव्याने सुरू असलेल्या रस्ते बांधकामाची पहिल्याच जोरदार पावसात पोलखोल झाली आहे. पावसाच्या पाण्यामुळे रस्त्याचा काही भाग खचल्याने या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली असून वाहनचालक व प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. लाखो रुपये खर्चून सुरू असलेल्या या कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



रंभापूर फाट्यापासून अकोटपर्यंतच्या रस्त्याचे बांधकाम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. मात्र कामाचा वेग अत्यंत संथ असल्याने नागरिक आधीच त्रस्त आहेत. त्यातच नव्याने तयार करण्यात आलेला रस्ता पहिल्याच पावसात खचल्याने कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्ता खचून उखडलेला भाग आणि साचलेले पाणी यामुळे अपघाताचा धोका वाढला असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, रस्ते बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून कामात आवश्यक तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आलेले नाही. त्यामुळे पावसाचे पाणी साचून रस्त्याची माती वाहून गेली आणि रस्ता खचल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पहिल्याच पावसात रस्त्याची अशी अवस्था झाल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

रस्ता खचल्यामुळे एका बाजूने वाहतूक सुरू ठेवावी लागत असल्याने दिवसभर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विशेषतः शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि रोजंदारीवर कामासाठी जाणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. अनेक वाहनचालकांनी संबंधित विभाग आणि कंत्राटदाराविरोधात संताप व्यक्त केला.

नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून रस्ते बांधकामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी, दोषी कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी आणि खचलेला रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा जनआंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

# उड्डाणपुलावर पाईप लाईन दुरूस्ती सुरू

प्रतिनिधी १ जुलै




**अकोला :** शहरातील उड्डाणपुलावर पाणी साचले आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने पुलाखालून जाणाऱ्या लोकांच्या अंगावर पाणी पडते. येथील समस्यांवर आर आर सी नेटवर्कने प्रकाश टाकला होता. त्याचा परिणाम झाला असून महापालिकेने फुटलेले पाईप दुरूस्तीचे काम हाती घेतले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

उड्डाणपुलावर साचलेले पाणी मोठ्या वाहनांमुळे दुचाकीस्वारांच्या अंगावर उडते. तसेच पुलाखालून जाणाऱ्या लोकांना अंगावर देखील उडते. साचलेले पाणी वाहून जाण्याची सोय नाही. फुटलेली पाईप लाईन हा मुख्य मुद्दा होता. या बाबतीत ओरड झाल्यामुळे अखेर महापालिका यंत्रणा जागी झाली. तसेच उड्डाणपुलाची फुटलेली पाईप लाईन दुरूस्तीचे काम सुरू आहे. यामुळे नागरिकांना भर पावसात ये जा करताना होणारी गैरसोय दूर होणार आहे.

# दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे डॉ.हेलन केलर जयंती साजरी



प्रतिनिधी १ जुलै

**अकोला :** स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम भारतभर निरंतर राबवले जात आहे.

२७ जून रोजी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे सूर्योदय बालगृह , मलकापूर येथे डॉ.हेलन केलर जयंतीचे आयोजन करण्यात आले होते . जगातील प्रथम स्नातक दिव्यांग महिला म्हणून डॉ.हेलन केलर जगविख्यात असून त्यांचे दिव्यांग बांधवांसाठी मोठे योगदान आहे . डॉ.हेलन केलर यांचा जीवन परिचय सूर्योदय बालगृहातील विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला . डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेच्या पूजनानंतर विद्यार्थ्यांसोबत प्रश्नमंजुषा व विविध खेळातून त्यांची सामाजिक जाणीव जागृत करण्यात आली . दिव्यांग सोशल फाउंडेशन व श्रीनाथजी सुपर शॉपी जठारपेठ तर्फे सूर्योदय बालगृहातील विद्यार्थ्यांना राशन किटचे वितरण यावेळी करण्यात आले . जुलै व ऑगस्ट महिन्यात अकोल्यातील विविध शाळेत डॉ.हेलन केलर यांच्या जीवनावर व्याख्यान व नाटिकेचे निशुल्क आयोजन दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे करण्यात येणार असून, ज्या विद्यालयांना या कार्यक्रमाचे आयोजन करायचे आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान डॉ.विशाल कोरडे यांनी केले . सूर्योदय बालगृहाचे श्री.शिवराज पाटील यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा देऊन अकोलेकरांनी दिव्यांग सोशल फाउंडेशन च्या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवावा असे मत व्यक्त केले . कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय कोरडे, शुभम गढे, अस्मिता मिश्रा, अनुराधा साठे, चैतन्य राठी व डॉ.संजय तिडके, यांनी सहकार्य केले.

# मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते मनपा शाळा क्र. २२ मध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात



प्रतिनिधी १ जुलै

**अकोला :** महानगरपालिकेच्या मराठी मुलांची शाळा क्र. २२, कृषीनगर येथे शाळा प्रवेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला अकोला महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सुनील लहाने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मनपा आयुक्त यांच्या हस्ते नवागत तसेच शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, शैक्षणिक साहित्य व शुभेच्छा देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मविश्वास व प्रेरणा निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. याच कार्यक्रमात शिष्यवृत्ती परीक्षा तसेच बी.टी.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुक केले.

याप्रसंगी नगरसेवक आशिष पवित्रकार, नगरसेविका प्राची निलेश काकड, आयुक्तांचे स्वीय सहायक जितेंद्र तिवारी तसेच अकोला महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी विद्यार्थ्यांनी नियमित शिक्षणासोबत शिस्त, स्वच्छता, वाचन आणि चांगले संस्कार जोपासावेत, असे सांगितले.

# जिल्हा स्त्री रुग्णालयात महिला सुरक्षा रक्षकावर हल्ला; घटना सीसीटीव्ही मध्ये कैद

प्रतिनिधी १ जुलै




**अकोला :** शहरातील जिल्हा स्त्री रुग्णालयात धक्कादायक घटना समोर आली आहे. रुग्णालयात कर्तव्य बजावणाऱ्या एका महिला सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यावर रुग्णाच्या पतीने अचानक हल्ला केल्याची घटना घडली आहे. ही संपूर्ण घटना रुग्णालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

अकोला शहरातील जिल्हास्तरीय स्त्री रुग्णालयात प्रसूतीसाठी मोठ्या प्रमाणात महिला रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक येत असतात. याच दरम्यान एका महिला रुग्ण आणि तिच्या पतीमध्ये काही कारणावरून वाद झाल्याची माहिती समोर आली आहे.

वाद सुरू असताना रुग्णालयातील महिला सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या गोष्टीचा राग मनात धरून काही वेळानंतर आरोपीने महिला सुरक्षारक्षकावर हल्ला केल्याचा आरोप आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एनआयसी कक्षाजवळ ड्युटीवर असलेल्या महिला सुरक्षारक्षक कर्तव्य बजावत असताना अचानक प्रदीप गावंडे यांनी त्यांच्यावर हात उचलला. ही घटना रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे कैद झाली आहे.

घटनेनंतर एनआयसी कक्षातील कर्मचाऱ्यांनी तातडीने ११२ क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर रामदास पेठ पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांनी आरोपीला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र, पोलिस कर्मचारी पोहोचेपर्यंत आरोपी फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेनंतर अकोला जिल्हा स्त्री रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यावर हल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाई होणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डायल ११२ वर खोटे कॉल करणाऱ्यावर ग्रामीण पोलिसांची कारवाई

वि.प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** नागरिकांच्या सुरक्षेसाठी सुरू करण्यात आलेल्या डायल ११२ या एकात्मिक आपत्कालीन मदत सेवेचा गैरवापर करणाऱ्या एका युवकाविरुद्ध अकोट ग्रामीण पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २९ जून २०२६ रोजी शुभम रघुनाथ भटकर (वय २५ वर्ष, रा. देऊळगाव, ता. अकोट, जि. अकोला) याने डायल ११२ या आपत्कालीन सेवा क्रमांकावर वारंवार कॉल करून खोटी माहिती दिली. या प्रकारामुळे आपत्कालीन सेवांच्या कामकाजात अडथळा निर्माण झाल्याने संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

डायल ११२ ही नागरिकांसाठी उपलब्ध असलेली एकात्मिक आपत्कालीन मदत सेवा असून अपघात, गुन्हे, आग, महिला व बालकांवरील अत्याचार, वैद्यकीय आणीबाणी तसेच इतर तातडीच्या प्रसंगी त्वरित मदत मिळविण्यासाठी या सेवेचा वापर केला जातो.

यावेळी अकोट ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, किरकोळ कारणांसाठी, खोटी माहिती देण्यासाठी किंवा विनाकारण डायल ११२ वर कॉल करून या महत्त्वाच्या सेवेचा गैरवापर करू नये. अशा प्रकारच्या खोट्या कॉलमुळे प्रत्यक्ष आपत्कालीन परिस्थितीत असलेल्या नागरिकांपर्यंत मदत पोहोचण्यास विलंब होऊ शकतो आणि त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

# शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहात प्राधान्याने मांडणार : आमदार प्रताप अडसड

## धामणगाव मतदारसंघाच्या विकासाला चालना देण्यासाठी कटीबद्ध

प्रतिनिधी १ जुलै



**अमरावती :** पावसाळी अधिवेशनात धामणगाव मतदारसंघात शेतकरी, लाडक्या बहिणी तसेच रोजगार निर्मितीवर भर देण्याबाबत सभागृहात विषय लावून धरू असे आमदार प्रताप अडसड यांनी आर आर सी नेटवर्कशी बोलताना सांगितले.

पीक विमा बाबतीत शेतकऱ्यांना अडचणी जाणवतात असे सांगून आमदार प्रताप अडसड म्हणाले, सर्व्हे करताना बरेच शेतकरी लाभापासून वंचित राहतात. यातून मार्ग निघावा यासाठी आवाज उठवू. तसेच लाडक्या बहिणी, रोजगार विषयक मुद्दे उपस्थित करणार आहे. महायुतीच्या काळात विकास कामे प्रचंड प्रमाणात झाली. तसेच येत्या काळात विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न करू असे आमदार प्रताप अडसड म्हणाले. आमचे अमरावती प्रतिनिधी संदीप मानकर यांनी त्यांच्याशी मुंबई येथे संवाद साधला.

# डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन मध्ये शाळा प्रवेश

**अडगाव बु. :** डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन येथे नविन शैक्षणिक वर्षाला दिनांक ३० जून रोजी एका अनोख्या पद्धतीने सुरवात करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम महात्मा फुले आणि सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

' देवाची पालखी गावांत येते. आज न्यायाची पालखी शाळेत आली आहे. ' असा जयघोष करत विद्यार्थी शाळेत आले. पालखी मध्ये भारतीय संविधान, पुस्तके ,महापुरुषांच्या प्रतिमा ठेवून प्रभात फेरी काढण्यात आली. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ,पालक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

# अमरावती विमानतळाची धावपट्टी विस्ताराचा मुद्दा सभागृहात प्राधान्याने मांडणार : आ. प्रवीण पोटे

## १८०० मीटर धावपट्टी तीन हजार मीटर होणे आवश्यक आहे

प्रतिनिधी १ जुलै



**अमरावती :** परिसराच्या विकासाशी विमानतळ विस्ताराचा मुद्दा निगडित आहे. यामुळे व्यापार उद्योगाला चालना मिळेल असे आमदार प्रवीण पोटे यांनी आर आर सी नेटवर्कशी विधीमंडळ परिसरात बोलताना सांगितले. बेलोरा विमानतळाची धावपट्टी सध्या १८०० मीटर आहे तीन हजार मीटर झाल्यास मोठी विमाने लँड होऊ शकतील. या संदर्भात आवाज उठवू असे आमदार प्रवीण पोटे म्हणाले.

विमानतळ तसेच शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी सभागृहात आवाज उठवू. पांदण रस्ते, शेतीला पाणी देणे यावर विधीमंडळात फोकस करू असे आमदार प्रवीण पोटे यांनी सांगितले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यावर भर राहील असे ते म्हणाले.

# आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत !

कृषि दिन हा कृषीप्रधान देशाचा एक पावन पर्व मानला जातो. त्यामुळे कृषी दिनाला विशेष असे महत्त्व आहे. कृषी दिन १ जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त शासन स्तरावर साजरा केला जातो. याच दिवशी अन्नदाता शेतकऱ्यांचा सर्वत्र सन्मान केला जातो. तसेच 'शेती आणि माती'वर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषीतज्ञ व प्रगतशील शेतकरी महानायक वसंतराव नाईक यांना आदरांजली अर्पण केल्या जाते. महानायक वसंतराव नाईक यांचे लोकशाही सक्षमीकरण, ग्रामीण विकास व विशेषतः कृषी औद्योगिक क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानामुळे त्यांना 'महानायक' , 'शेतकऱ्यांचा जाणता राजा' म्हणूनही संबोधले जाते. भारताचे राष्ट्रपती , भारतरत्न डॉ. प्रणव मुखर्जी यांनी 'वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे.' या शब्दात नाईकांचे गौरव केले. तसेच 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी 'आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत' या शब्दात महानायक वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे.

## कृषीदिनाचा बांधापर्यंतचा प्रवास

या दिवशी कृषीसंस्कृतीचे संस्मरण करून कृषीसंस्कृतीच्या समृद्धीसाठी संकल्प केल्या जाते. हा पर्व थेट बांधावर , शेत शिवारातही साजरा होत असून यात शेतकरी सन्मान, समुपदेशन , नव कृषी तंत्रज्ञानाची ओळख , फळझाडांची लागवड व शेतकऱ्यांचे भाग्यविधाते महानायक वसंतराव नाईकांना आदरांजली अशा विविध स्वरूपात साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी , शेतकऱ्यांना आत्महत्यापासून परावृत्त करून आत्मबळ मिळावे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी या उद्देशाने प्रसिद्ध विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिवस थेट बांधावर , शेत शिवारात साजरा करण्याची सर्वप्रथम मोहीम सुरू केली होती. या मोहीमेची दखल पुढे सामाजिक स्तरासोबतच 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'ने दखल घेतली. शिवाय पुढे सन २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या काळात शासनस्तरावरही दखल घेण्यात आली. त्यामुळे कृषी दिन थेट शेत बांधावरही साजरा होत असल्याने या दिवसाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. ड५ड़६ क़ार्यालयात साजरा होणारा कृषी दिन हा आता थेट बांधावरही साजरा केला जात असून कृषीदिनानिमीत्त थेट बांधावर कृषी संजीवनी सप्ताह , वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियान व शेतकरी कृतज्ञता सप्ताह सारखे स्तुत्य उपक्रम दरवर्षी राबविले जातात.



भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला. तेंव्हापासून १ जुलैला शासकीय स्तरावर सर्व कार्यालयात कृषीदिन साजरा होत आहे. तर दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शेतकऱ्यांचे कैवारी, शेतीवर निस्सीम भक्ती असणारे क्रांतिकारी कृषीसंत वसंतराव नाईक नेहमी म्हणायचे कि, 'मी मुख्यमंत्र्यांच्या सिंहासनावर देहाने असलो तरी माझे चित्त मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर असतो.' हा 'वसंतविचार' लक्षात घेता शेतकऱ्याप्रति कृतज्ञता, शेतकऱ्याना आत्मबळ व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची ओळख देण्यासाठी प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची अभिनव संकल्पना रूजवली. तेंव्हापासून कृषीदिवस हा थेट बांधावर शेत शिवारातही साजरा करण्यास सुरुवात झाली.ड३. कार्यालयात साजरा होणारा कृषीदिवस आज थेट शेत बांधावरही साजरा करण्याची प्रथा रूढ झाली. कृषी दिन 'शासकीय कार्यालयीन स्तरावर ते थेट शेत बांधावर ' साजरा करण्याच्या या प्रवासात मात्र 'पवार' हा एक दुर्मिळ संयोग जुळून आल्याचे म्हणता येईल. आज कृषी दिवस हा कार्यालयाबरोबरच थेट शेतबांधापर्यंत सर्वत्र साजरा होतो. इतर राज्यात देखील १ जुलैला कृषी दिन साजरा होतांना दिसून येते.

कृषीप्रधान भारत म्हणून ओळखले जाणाऱ्या देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून १ जुलै कृषीदिनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावर आलेला एक पावनपर्व आहे. महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायत राज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते 'पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा' म्हणून ओळखले जातात. भूमिहिनांना लाखो एकर जमीन त्यांनी वाटप केली. शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीण्याचे तसेच कृषीसंस्कृतीला नवसंजीवनी देण्याचे ऐतिहासिक कार्य महानायक वसंतराव नाईक यांनी केले. शिवाय पहिल्यांदाच चार कृषी विदयापीठाची स्थापना केली. १९७२ सारख्या भिषण दुष्काळातही महानायक वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत कधी 'शेतकरी आत्महत्या' हा शब्द देखील गवसला नव्हता. शेतकऱ्यांवर त्यांचे जिवापाड प्रेम होते. शेती आणि मातीवरील त्यांची निस्सीम भक्ती ही भारतीय कृषीसंस्कृतीच्या इतिहासात एक प्रेरणा म्हणून ओळखली जाते. 'शेतकरी हा कारखानदार झालाच पाहिजे अन् शेतकऱ्यांचे लेकरं सुद्धा कलेक्टर झाली पाहिजे.' हे महानायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न होते. थेट बांधावर आधुनिक कृषीतंत्रे व दूरगामी उपाययोजनांची अमलबजावणी याबरोबरच नव्या पिढीत शेती, शेतकऱ्याप्रति जिव्हाळा निर्माण केल्यास नाईकसाहेबांचे स्वप्ने पुर्णत्वास येऊ शकते. भारतीय कृषीसंस्कृतीला उजाळा देणाऱ्या 'कृषी दिन' या पावन पर्वाचे जनमाणसात अनन्यसाधारण असे महत्त्व असून शासकीय कार्यालय , गाव शहरात अनेक जयंती साजरी केली जाते. त्याचबरोबर थेट बांधावर-शेत शिवारातही प्रमाणात 'कृषी दिवस' साजरा होत असल्याने या पर्वाला एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शेती व शेतकऱ्यांवरील निर्व्याज प्रेम आणि कृतज्ञता म्हणून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' मोहीमेचे प्रवर्तक एकनाथराव पवार यांनी सन २०११ पासून कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची मोहीम सुरू केली. आज ही संकल्पना एक प्रथा म्हणून नावारूपाला आली.

सिटी न्यूज अकोला

बुधवार दि. १ जुलै २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# प्रभाग 12 मध्ये 100 कोटीची मोकळ्या जागेची चोरी

## ■ शिवसेना नगरसेवक सागर भारूका यांचा सनसनाटी आरोप

प्रतिनिधी १ जुलै

**अकोला:** शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये १०० कोटी मूल्य असलेल्या मोकळ्या जागेची चोरी झाली. शहराचा विचार करता हा घोटाळा १ हजार कोटीच्या वरचा आहे. मुलांच्या खेळण्याच्या जागांवर डल्ला मारला आहे.

मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती गठीत करून जे कोणी नेते, अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना नगरसेवक सागर भारूका यांनी केली.



प्रभाग १२ मधील मुलांच्या खेळण्याच्या जागा हडप करण्यात आल्या. ही अतिशय गंभीर बाब आहे. विकास आराखड्यात ग्रीन झोन दाखवला आहे. परंतु मोठा घोळ झालेला दिसतो. २०२२ मध्ये द्विवेदी मॅडम आयुक्त असताना त्यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन मोकळ्या जागा ताब्यात द्या अशी मागणी केली होती. २०२४,२५ आणि २६ मध्ये आयुक्त लहाने यांनी सरकारी मालमत्ता खुली करा असे आदेश दिले. परंतु त्यावर काहीच कारवाई नाही. सरकारी खजान्याची लूट असून या पावसाळी अधिवेशनात आवाज उठला पाहिजे असे सागर भारूका आर आर सी नेटवर्कशी बोलताना म्हणाले. प्रभाग क्रमांक १२ चा लढा आपण जिंकून दाखवू असा निर्धार व्यक्त केला.

## अकोला बार असोसिएशनच्या सर्व बार रूममध्ये उच्चगती वाय-फाय इंटरनेट सेवेचा शुभारंभ

प्रतिनिधी १ जुलै

**अकोला:** अकोला बार असोसिएशनच्या वतीने ३० जून २०२६ रोजी बार असोसिएशनच्या सर्व बार रूममध्ये आरआरसी ब्रॉडबँड उच्चगती वाय-फाय इंटरनेट सेवेचा शुभारंभ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. डी. पी. सातवलेकर यांच्या हस्ते तसेच जिल्हा न्यायाधीश-२ सौ. एस. आर. पहाडे व ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. बी. के. गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सध्याच्या डिजिटल युगात अधिवक्त्यांना न्यायालयीन कामकाज अधिक गतिमान, कार्यक्षम व तांत्रिकदृष्ट्या सक्षम पद्धतीने पार पाडता यावे, ऑनलाइन कायदे, न्यायनिर्णय, ई-फायलिंग, संशोधन तसेच इतर इंटरनेट आधारित सुविधांचा सहज लाभ घेता यावा या उद्देशाने बार असोसिएशनच्या सर्व बार रूममध्ये ही सुविधा नि शुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे.




हा महत्त्वाकांक्षी उपक्रम अकोला बार असोसिएशनच्या विद्यमान कार्यकारिणीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून साकार झाला आहे. अकोला बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अजय वाघमारे,, वरिष्ठ सचिव ॲड. दुष्यंत आर. धोत्रे, उपाध्यक्ष ॲड. विजय भांबेरे , महिला उपाध्यक्षा ॲड. शीतल गवई तसेच संयुक्त सचिव ॲड. प्रमोद डी. कोरडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

विद्यमान कार्यकारिणी बारच्या सर्वांगीण विकासासाठी व अधिवक्त्यांच्या हितासाठी सातत्याने कटिबद्ध असून, वाय-फाय इंटरनेट सेवेचा हा उपक्रम त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. इंटरनेट क्रांतीच्या या युगात ही सुविधा अधिवक्त्यांच्या ज्ञानवृद्धीस, कायदेशीर संशोधनास, डिजिटल न्यायप्रणालीचा प्रभावी वापर करण्यास तसेच बार असोसिएशनला आधुनिक व तंत्रज्ञानस्नेही संस्थेच्या दिशेने नेण्यास निश्चितच मोलाची ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास बार असोसिएशनचे पदाधिकारी, ज्येष्ठ अधिवक्ते, सदस्य अधिवक्ते तसेच न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकारांना धमकी प्रकरणी खासदारांवर कठोर कारवाईची मागणी



प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** ग्रामीण पत्रकार संघ तालुक्याचे वतीने पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत कारवाई करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. खा.संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना खुलेआम जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या कथित प्रकरणीअसभ्य वागणुक दिली व धमकावले. त्याप्रकरणी त्यांचेवर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत तसेच भारतीय न्याय संहिता आणि इतर लागू कायदेशीर तरतुदीनुसार तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी ग्रामीण पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष गजानन वाघमारे यांचे आदेशाने प्रदेश कार्यकारिणीचे राजेश डांगटे, अवीनाश राठोड,अनंत गावंडे, गोपाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात, विभागीय समन्वयक कमलेश राठी, विभागीय उपाध्यक्ष, अहमद शेख,जिल्हा उपाध्यक्ष राजेश सावीकार,पवन बेलसरे यांचे प्रमुख उपस्थितीत तालुकाध्यक्ष नरेंद्र कोंडे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी मार्फत दिले.

ग्रामीण पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अरुण काकड,सचीव देवानंद आंग्रे, यांचेसह, गोवर्धन चव्हाण, साधुबुवा खोटरे, शरद भेंडे, धन्नु बायवार,पुर्णाजी खोडके, शाम महाजन,वैभव गुजरकर यांचे सह पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय शाळेत माजी विद्यार्थ्याकडून विद्यार्थ्यांचे आगळे वेगळे स्वागत



प्रतिनिधी १ जुलै

**अकोला :** स्थानिक अकोला टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा उमरी मोठी येथे शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी पर्वणी ठरला शाळेतील चिमुकल्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी स्कूल बॅग, वॉटर बॅग, मिठाई, चॉकलेट पुष्पगुच्छ भेट देऊन आगळ्या वेगळ्या पद्धतीने सर्व चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता याच सोबत राष्ट्रीय शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांचा सुद्धा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संपदा नावकर मॅडम बर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित म्हणून दिगंबर वनारे , उमेश मसने, मुख्याध्यापक नयना इनामदार , मुख्याध्यापक दत्तात्रय कोल्हे, योगेश यमतकर सर, रूपाताई ठाकरे मॅडम सुनील भातुलकर, तर उपस्थिती म्हणून सारिका काळे मॅडम, विजय मेश्राम, प्रतिमा वडगावकर ,किरण सावके, संतोष गावंडे, शरद इंगोले, अंबादास निकाळजे, शैलेश ओळंबे, रवींद्र वानखडे, नितीन बर्गे , गुड्डू अत्तर कार, बबलू इंगोले, महादेव पत्रकार इत्यादींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी मुरूमकर मॅडम तर आभार प्रदर्शन साधनाताई देशमुख मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## जिप शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित

प्रतिनिधी १ जुलै

**हिवरखेड :** येथील जि, प , प्राथमिक कन्या शाळेत ३०, जून रोजी येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांन मध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले, बऱ्याच दिवसांनंतर चिमुकले विद्यार्थ्यांनी पुन्हा शाळा सुरू होण्याच्या दुष्टीनेकोणाने परत एकमेकांस भेटले,या दिनी शाळेच्या वतीने येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांना शालेय



गणवेश व शालेय वस्तू वितरीत करण्यात आल्या, यावेळी शाळेचे मुख्याध्यापक निलेश खिरोडकार, खडसे गुरुजी, आम्ले मैडम, भोपळे मैडम, लहाने मैडम, पल्लवी खिरोडकार इत्यादीसह पाल्य वर्गाची उपस्थिती होती,

## वसुंधरा ज्ञानपीठ मध्ये नव्या शैक्षणिक वर्षाचे उत्साहात स्वागत

वि. प्रतिनिधी २८ जून

**अकोट :** उन्हाळी सुट्टीनंतर वसुंधरा ज्ञानपीठात नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात सुरुवात करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे प्रवेशद्वारावर फुले, टाळ्यांचा कडकडाट आणि आकर्षक सजावटीच्या साक्षीने स्वागत करण्यात आले.

नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात सामाजिक बांधिलकीच्या संदेशाने व्हावी या उद्देशाने नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

मुख्याध्यापक शिवचरण नारे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना जिद्द, चिकाटी आणि सातत्य यांच्या बळावर यश संपादन करता येते, असे सांगितले. सकाळ




सत्राच्या पर्यवेक्षिका कु. छाया बनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# अकोट विधानसभा मतदारसंघात मतदारयादी पुनरीक्षण मोहिमेला प्रारंभ

वि. प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** २८-अकोट विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास मंगळवारपासून सुरुवात झाली. अकोट व तेल्हारा तालुक्यातील एकूण ३४६ मतदान केंद्रांवर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांना एन्युमरेशन फॉर्मचे वितरण करीत आहेत.




या मोहिमेत अकोट तालुक्यातील १८६ आणि तेल्हारा तालुक्यातील १६० अशा एकूण ३४६ मतदान केंद्रांचा समावेश आहे. मतदार यादीतील माहिती अद्ययावत व अचूक करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त झालेले एन्युमरेशन फॉर्म मतदारांना वितरित करण्यात येत आहेत.

मोहिमेच्या प्रारंभी मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, सहायक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सुनील चव्हाण, अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी सुभाष सावंग, मनोज मानकर, सुधीर थेटे व कु. अंजली घरडे यांनी विविध मतदान केंद्रांना भेटी देऊन कामकाजाची पाहणी केली. तसेच बीएलओंसोबत प्रत्यक्ष अर्ज वितरण मोहिमेत सहभागी होत त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले.

मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगून प्रशासनाने सर्व मतदारांना आवाहन केले आहे. घरपोच येणाऱ्या बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देत सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी मनोज लोणारकर यांनी केले.

## उन्हाळी सुट्टीनंतर लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठात पुन्हा गजबज

प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** उन्हाळी सुट्टीनंतर लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठात पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची लगबग आणि उत्साह पाहायला मिळाला. दीर्घ सुट्टीनंतर शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. नव्या शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी शाळा परिसरात आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले होते.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लूनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, प्राचार्य रामेश्वर पातोंड तसेच उपप्राचार्य नितीन गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या कोषाध्यक्षा रेखाजी चांडक यांनी विद्यार्थ्यांचे कुमकुम तिलक लावून स्वागत केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नव्या जोमाने, शिस्तबद्धपणे आणि जिद्दीने अभ्यास करण्याचे आवाहन केले. तसेच आगामी शैक्षणिक वर्षातील विविध उपक्रम, स्पर्धा आणि शैक्षणिक कार्यक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात किरण मॅडम आणि प्राजक्ता महाजन यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमाचे प्रभावी आणि आकर्षक सूत्रसंचालन विशाल चांदूरकर यांनी केले. तर कुमारी दीक्षिता चोपडे हिने उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## तालुक्यात 85 ग्रामपंचायतींची सामाजिक अंकेक्षण जनसुनावणी



प्रतिनिधी १ जुलै

**अकोट :** सामाजिक अंकेक्षण पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय मुंबई व पंचायत समिती अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने अकोट तालुक्यातील ८५ ग्रामपंचायतींच्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेची अंतिम जनसुनावणी आज येथे अत्यंत यशस्वीरीत्या व पारदर्शक वातावरणात पार पडली.

या जाहीर जनसुनावणी दरम्यान तालुक्यातील विकासकामांच्या सामाजिक अंकेक्षणाचा अहवाल वाचन करण्यात आला,मजूर, दक्षता समिती आणि रोजगार सेवकांच्या मानधनाचा प्रश्न शासन दरबारी मांडणार तसेच रोजगार सेवकांचे मानधन व मजुरांच्या विविध प्रश्नांवर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. प्रमुख मान्यवरांची उपस्थिती या जनसुनावणी प्रक्रियेसाठी विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा कायदेतज्ज्ञ सीमा कुलकर्णी यांनी मुख्य पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले. तसेच समिती सदस्य म्हणून पत्रकार प्रतिनिधी गणेश शंकर वाकोडे, मजूर प्रतिनिधी श्रीमती मंगला वानखेडे, संस्था प्रतिनिधी अनिता पांडे आणि जिल्हा साधन व्यक्ती शितल पाटील मानखैर यांनी उपस्थित राहून सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली. अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी, सह गट विकास अधिकारी खुम्मकर, एपीओ बूंदे , तांत्रिक अधिकारी संदीप आगे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी आणि वनीकरण विभाग अधिकारी उपस्थित होते.

जनसुनावणीत रोजगार सेवकांच्या मानधनाचा विषय गांभीर्याने घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक अंकेक्षण टीम आणि ग्राम साधन व्यक्ती विपुल लिंगोट, गणेश चव्हाण, आशिष चोटमल यांच्यासह संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.

## गावात वायरमन नसल्याने पंचाईत

प्रतिनिधी १ जुलै

**हातरूण :** पाणी पावसाचे दिवसात वीज पुरवठा कधी खंडित होईल सांगता येत नाही. परंतु गावात एकही वायरमन हजर राहत नसल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गावात रात्रंदिवस वायरमन हजर राहिला पाहिजे. नसल्यास गावातील नागरिकांना अंध्यारात रहाण्याची वेळ येते. पावसाळयाचे दिवस असल्यामुळे साप, विंचू चावण्याची दाट शक्यता असते. गावात एक वायरमन उपस्थित असला पाहिजे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर, अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्टये :

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.

- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला
## ई-निविदा सुचना ०७/२०२६-२०२७

जावक क्रमांक/४०५८/ ईनिसु-०७/ निलि /२०२६ / दिनांक २४/०६/२०२६

email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No 0724-2435197

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र.१ ते ३ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच अंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदे स्पर्धे मध्ये भाग घेवू शकेल. निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यातील बोर्टा माना जामठी कार्ली रस्ता प्रजिमा-१५ च्या कि.मी. ३/०० ते ७/५०० व १०/०० ते १५/५०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे ता. मुर्तिजापूर | ९९२२२३४८ |
| २ | अकोला जिल्हयातील बार्शिटाकळी तालुक्यातील आंबेटाकळी कापशी बार्शिटाकळी रामा-२७४ कि.मी.१३६/०० ते १४२/५०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे (राममा-७५३ ई वरवंड फाटा पासून करवंड पर्यत आणि राज्यमार्गाचा विस्तार प्रजिमा-१२५ करवंड पासून उंद्री पर्यत उंद्री पासून आंबेटाकळी आडगांव पर्यत आणि दिग्रस बु. पासून हिंगणा आणि वाडेगांव बार्शिटाकळी पर्यत आणि वडाळा पासून पिंजर खेर्डा नागझरी ते राममा-३६१ सी पर्यत) | ५२८१८४९० |
| ३ | अकोला जिल्हयातील कुरुम ते माटोडा रस्ता प्रजिमा-२५ कि.मी.०/०० ते १/६०० मध्ये रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे | ४६१३४९२९ |

**अटी व शर्ती -**

१. सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. ई-निविदा काम क्र.१ ते ३ कामांची ई-निविदा दिनांक ०१.०७.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक ०८.०७.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक १०.०७.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे)

३ वरील काम क्रं.१ ते ३ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक ०२/०७/२०२६ वेळ १२.०० वा. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे आयोजित करण्यात येईल.

४ वरील काम क्रं. ०१ ते ०३ कामांची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील

५. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in

६ ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

७. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही. तसेच निधी उपलब्ध झाल्यानुसार देयके अदा करण्यांत येतील.

८ ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
**कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग अकोला**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## अतिक्रमण नियमित करण्यासाठी मुद्रांक पत्राची सक्ती नको

प्रतिनिधी १ जुलै

**कळंब** : नगरपंचायत हद्दीतील नझूल जागेवरील निवासी अतिक्रमण नियमितीकरण प्रकरणात शासन निर्णयानुसार केवळ स्वघोषणापत्र स्वीकारावे, मुद्रांक पत्रावरील शपथपत्राची सक्ती करू नये, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयात अर्जदाराकडून स्वघोषणापत्र घेण्याची स्पष्ट तरतूद आहे. मात्र, काही प्रकरणांत १०० रुपयांच्या दोन मुद्रांक पत्रांवर शपथपत्र सादर करण्याची सक्ती केली जात असल्याची तक्रार संबंधितांनी केली आहे. याबाबत ओमप्रकाश मारोतराव भवरे यांनी नगरपंचायतीकडे निवेदन सादर करून शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. मुद्रांक पत्रांची सक्ती केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर अनावश्यक आर्थिक भार पडत असून, शासनाने दिलेल्या सवलतीचा उद्देशच बाधित होत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तत्काळ योग्य निर्देश देऊन ही सक्ती थांबवावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# मुदतबाह्य कीटकनाशकांचा साठा जप्त

### १७.८२ लाखांचा मुद्देमाल सीलबंद : कृषी विभागाच्या भरारी पथकाची खैरगाव येथे कारवाई

प्रतिनिधी १ जुलै



**यवतमाळ** : पांढरकवडा तालुक्यातील खैरगाव (दे.) येथे कृषी विभागाच्या भरारी पथकाने केलेल्या कारवाईत मुदतबाह्य कीटकनाशके, अनधिकृत रासायनिक खते व जैवउत्तेजकांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी १७ लाख ८२ हजार १३५ रुपयांचा २,२८५ किलो मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधित तरुणाविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कृषी विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे खैरगाव (दे.), ता. केळापूर येथील रहिवासी यश गजानन शिवनवार (वय २६) यांच्या राहत्या घरावर मंगळवारी छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान कोणताही वैध परवाना नसताना विक्रीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात मुदतबाह्य कीटकनाशके, रासायनिक खते आणि जैवउत्तेजकांचा साठा करून ठेवल्याचे आढळून आले.

पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत ३५८.५५ किलो मुदतबाह्य कीटकनाशके, १,७३५ किलो अनधिकृत रासायनिक खते आणि १८८.१५ किलो जैवउत्तेजक असा एकूण २,२८५ किलो साठा जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १७ लाख ८२ हजार १३५ रुपये असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

याप्रकरणी यश शिवनवार यांच्याविरुद्ध कीटकनाशक अधिनियम १९६८, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत विविध कलमांनुसार पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हास्तरीय भरारी पथकाचे अध्यक्ष तथा मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धीरज मोहेकर, कृषी अधिकारी सुरेश चव्हाण, रुपाली इंगळे, राहुल डाखोरे, निलेश भोयर, सुरेश बुटले आणि राहुल डंभारे यांनी ही कारवाई केली.

संचालक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रवीण देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे आणि कृषी विकास अधिकारी लहूदास आडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

## काँग्रेसच्या पुसद तालुका अध्यक्षपदी ज्ञानदीप कांबळे यांची नियुक्ती

प्रतिनिधी १ जुलै

**पुसद** : अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या संघटन सृजन अभियानांतर्गत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने पुसद तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी ज्ञानदीप कांबळे यांची नियुक्ती केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

संघटन सृजन अभियानाच्या अनुषंगाने प्रदेश काँग्रेसच्या निरीक्षकांनी विधानसभा मतदारसंघनिहाय दौरे करून स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली होती. त्यानुसार करण्यात आलेल्या शिफारशींचा विचार करून ज्ञानदीप कांबळे यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.

माळ पठार परिसरातील प्रभावी युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या ज्ञानदीप कांबळे यांनी यापूर्वी भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष म्हणून गोरगरीब व वंचितांच्या न्यायहक्कांसाठी काम केले आहे. त्यानंतर काँग्रेस पक्षात प्रवेश करून त्यांनी पुसद तालुका काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. माजी सामाजिक न्याय मंत्री तथा खासदार चंद्रकांत हांडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दोन दशकांपासून त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर आंदोलने, मोर्चे आणि उपोषणे करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना ज्ञानदीप कांबळे यांनी ग्रामीण भागात काँग्रेस संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. माळ पठारावरील चाळीस



गावांचा पाणीप्रश्न, पुसद जिल्हा निर्मितीचा मुद्दा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे काम, रखडलेली घरकुल योजना, पांदण रस्ते तसेच ग्रामीण भागातील विविध विकासकामांसाठी शासन दरबारी सातत्याने लढा उभारून न्याय मिळवून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ज्ञानदीप कांबळे यांच्या निवडीमुळे माळ पठार परिसरासह पुसद तालुक्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आपल्या निवडीचे श्रेय त्यांनी काँग्रेस नेते तथा नगर परिषद विरोधी पक्षनेते डॉ. मोहम्मद नदीम, जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, माजी आमदार डॉ. वजाहत मिर्झा तसेच पत्रकार बांधवांना दिले.

## पुसदमध्ये पावसाची दमदार हजेरी

### साचलेल्या पाण्यात चिमुकल्यांचा जल्लोष

प्रतिनिधी १ जुलै



**पुसद** : पुसद शहरात मंगळवारी झालेल्या दमदार पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले. गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या उकाड्यानंतर झालेल्या या पावसामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

पावसाच्या जोरदार सरींमुळे शहरातील काही मोकळ्या जागा आणि मैदानांमध्ये पाणी साचले. या पाण्यात परिसरातील चिमुकल्यांनी मनमुराद आनंद लुटला. पावसाची पर्वा न करता पाण्यात धावपळ, खेळ आणि जल्लोष करत त्यांनी पावसाच्या आगमनाचा आनंद साजरा केला.

पावसात भिजत खेळणाऱ्या मुलांचे हे निरागस दृश्य पाहण्यासाठी नागरिकांनीही गर्दी केली. या क्षणांनी अनेकांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही मान्सूनच्या आगमनाने चिमुकल्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दरम्यान, साचलेल्या पाण्यात खेळताना मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक असल्याने पालकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाचा आनंद लुटतानाच सुरक्षिततेलाही प्राधान्य देण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे.

## 'स्कूल चले हम'; जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत : गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण

प्रतिनिधी १ जुलै





**यवतमाळ** : उन्हाळी सुट्टीनंतर मंगळवारपासून जिल्ह्यातील शाळा पुन्हा गजबजल्या. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला 'शाळा प्रवेशोत्सव' जिल्हाभर उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी, वरिष्ठ अधिकारी, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना शिक्षणाच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी गोधणी रोड येथील जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. तसेच त्यांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजना, उपलब्ध सुविधा आणि जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदाऱ्यांचे भान ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी शाळेतील विविध सुविधांची पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा आणि उपाययोजनांबाबत सूचना केल्या. तसेच शाळा परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

चिचबर्डीतही उत्साहात प्रवेशोत्सव

जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन प्रवेशोत्सवात सहभाग घेतला. यवतमाळ तालुक्यातील चिचबर्डी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. मुख्याध्यापिका संगीता चनेकर, लिपिक विजय राठोड, शिक्षकवृंद आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी पुत्राची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी १ जुलै



**मारेगाव** : मारेगाव पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या वेगाव येथील २० वर्षीय शेतकरी पुत्राने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना मंगळवार दि. ३० जून २०२६ ला सकाळी ६ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

विश्वास उर्फ सिद्धांत व्यासनाथ मत्ते वय २०, रा. वेगाव, ता. मारेगाव असे मृतकाचे नाव आहे. त्यांच्या कुटुंबाकडे सुमारे चार एकर शेती असून ते शेतकरी कुटुंबातील होते. त्यांच्या पश्चात आई, वडील व एक बहीण असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

त्याच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून घटनेची माहिती मिळताच मारेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले घटनास्थळ पंचनामा करून त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय मारेगाव येथे पाठवण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर दानडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किसन सुनकुरवार पोलीस कॉन्स्टेबल संभा लनगुडे करीत आहेत.

## जे.एस.पी.एम. उर्दू हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

### फुलसावंगीत नवीन शैक्षणिक वर्षाची जल्लोषात सुरुवात



प्रतिनिधी १ जुलै

**फुलसावंगी** : नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी फुलसावंगी येथील जे.एस.पी.एम. उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज (कला शाखा) येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत नियमित उपस्थिती, शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी नवागत विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांची ओळख करून घेतली. तसेच शाळेतील विविध उपक्रम, नियम आणि शैक्षणिक वातावरणाची माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे शाळेचा परिसर चैतन्यमय झाला होता. यावेळी शिक्षक सय्यद वसीम रिझवी, सय्यद मुजाहिद, शाहिद खान, शबिना बानो, सुमय्या अंजुम, फातेमा शेख तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी इरफान देशमुख, शेख जावेद, रफीक गौरी, रफीक नवाब आणि शेख मुजफ्फर उपस्थित होते.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण होण्यासह शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित झाला असून नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे.

## नेग वसुलीच्या वादातून किन्नरांचे दोन गट भिडले; दोन्ही गटांमध्ये लेखी समझोता

प्रतिनिधी १ जुलै

**वणी** : नेग वसुलीच्या अधिकारावरून वणी शहरात मंगळवारी किन्नरांच्या दोन गटांमध्ये वाद उफाळून आला. शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर धक्काबुक्की व मारहाणीत झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर दोन्ही पक्षांमध्ये लेखी समझोता झाल्याने प्रकरण निवळले.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील किन्नरांचा एक गट गेल्या अनेक वर्षांपासून वणी शहरात विवाह, बाळाचा जन्म, गृहप्रवेश आदी मांगलिक कार्यक्रमांमध्ये नेग वसुलीचे काम करीत आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून अमरावती व यवतमाळ येथील दुसरा किन्नर गटही शहरात नेग वसुली करू लागल्याने उत्पन्नाच्या वाटणीवरून वाद निर्माण झाला होता.

यापूर्वीही या प्रश्नावर तोडगा काढण्याचे प्रयत्न झाले होते. मात्र, कोणताही निर्णय न झाल्याने मंगळवारी दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आले. वाद चिघळून धक्काबुक्की व मारहाणीपर्यंत पोहोचल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

घटनेनंतर दोन्ही गट वणी पोलीस ठाण्यात दाखल झाले. तेथेही एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरूच होते. पोलीस निरीक्षक भानुदास पिदूरकर यांनी दोन्ही गटांच्या प्रतिनिधींशी सुमारे दोन तास चर्चा करून समुपदेशन केले. अखेरीस, दोन्ही पक्षांनी शहरात शांतता राखण्याचे व एकमेकांच्या नेग वसुलीच्या कामात हस्तक्षेप न करण्याचे लेखी आश्वासन दिले.

घटनेची माहिती शहरभर पसरताच वणी पोलीस ठाण्याबाहेर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. घडामोडी जाणून घेण्यासाठी अनेकांनी पोलीस ठाण्याकडे धाव घेतली.

दरम्यान, कोणताही किन्नर अथवा इतर व्यक्ती जबरदस्तीने नेग किंवा पैशांची मागणी करत असल्यास, दबाव टाकत असल्यास किंवा त्रास देत असल्यास नागरिकांनी तातडीने पोलीस ठाण्यात तक्रार करावी. अशा प्रकरणांत कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक भानुदास पिदूरकर यांनी दिला.

# हिवरा बसस्थानकावर वाहतूक कोंडी

प्रतिनिधी १ जुलै



**महागाव** : महागाव तालुक्यातील हिवरा संगम येथील बसस्थानक परिसरात वाढत्या अतिक्रमणामुळे आणि अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत असून प्रवासी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे अनेकदा अपघातही घडले असून संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील हिवरा संगमजवळ बायपास रस्त्याचे काम शासन स्तरावर प्रस्तावित करण्यात आले आहे. मात्र, विविध कारणांमुळे हे काम अद्याप रखडलेले असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. बायपासचे काम पूर्ण झाल्यास गावातील वाहतुकीवरील ताण कमी होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

हिवरा बसस्थानकावर अधिकृत थांबा असतानाही अनेक एसटी बसेस येथे न थांबता पुढे जात असल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदनेही दिली आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे.

हिवरा संगम हे तालुक्यातील प्रमुख बाजारपेठेचे केंद्र असून परिसरातील अनेक गावांतील शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी येथे आणतात. तसेच शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, बँकेची कामे करणारे नागरिक आणि व्यापाऱ्यांचीही या ठिकाणी मोठी वर्दळ असते. त्यामुळे वाहतुकीची समस्या अधिक तीव्र होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. हिवरा संगम येथील वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि एसटी बसेस न थांबण्याची समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

## पाच हजार बालकांना पल्स पोलिओचा डोस; ३० बूथवर ९० आरोग्य कर्मचाऱ्यांची सेवा

### नगराध्यक्षा तेजश्री जैन यांच्या हस्ते शुभारंभ

प्रतिनिधी १ जुलै

**उमरखेड** : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत उमरखेड शहरात रविवारी पाच हजारांहून अधिक बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला. शहरातील ३० बूथवर ९० आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबविली.

राजाराम प्रभाजी उत्तरवार शासकीय उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने मोहिमेसाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली होती. शून्य ते पाच वर्षे वयोगटातील जवळपास सहा हजार बालकांना लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यापैकी पाच हजारांहून अधिक बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला.

स्थानिक महात्मा गांधी चौक येथील बूथवर नगराध्यक्षा तेजश्री संतोष जैन यांच्या हस्ते एका बालकाला पोलिओ लस पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे डॉ. यादव राऊत, डॉ. विशाल माने, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. संभाजी डोंगे, डॉ. अक्यामवार, सह आरोग्य निरीक्षक आर. हिंगमिरे, लसीकरण विभाग प्रमुख शीतल बोंडगे, आरोग्य सेवक ए. विणकर यांच्यासह आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

देशात १९९५ पासून सातत्याने पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून १३ जानेवारी २०११ नंतर देशात एकही पोलिओग्रस्त रुग्ण आढळून आलेला नाही. या मोहिमेच्या यशामुळे भारताने पोलिओमुक्त देशाचा दर्जा कायम राखला आहे. ही स्थिती कायम ठेवण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत पोलिओचा डोस पोहोचविणे आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले.

चौकट : पाच दिवस घराघरांत जाऊन लसीकरण

बूथवर लसीकरणापासून वंचित राहिलेल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पुढील पाच दिवस घराघरांत जाऊन पोलिओचा डोस देण्यात येणार आहे. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने दिली.

सिटी न्यूज अमरावती
बुधवार दि. १ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# महानगरपालिकेच्या शाळांचा पहिला दिवस उत्साहात

## आयुक्तांसह लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शाळांना भेटी, विद्यार्थ्यांना दिला शिक्षणाचा प्रेरणादायी संदेश

प्रतिनिधी १ जुलै

**अमरावती** : अमरावती महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी, मंगळवार ३० जून रोजी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळांमधील शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती, मूलभूत सुविधा, अध्यापनाची तयारी तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी शहरातील विविध महानगरपालिका शाळांना नियोजनबद्ध भेटी दिल्या.



या विशेष उपक्रमात जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी सागर वानखडे, मुख्यलेखाधिकारी श्यामसुंदर देव, शहर अभियंता रविंद्र पवार, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, विवेक देशमुख, उपअभियंते आशिष अवसरे, सुहास चव्हाण, श्रीरंग तायडे, एस. एस. टोपरे, सहायक अभियंता राजेश आगरकर, शाखा अभियंता एस. एस. तिनखेडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ.विजय शिंदे व डॉ.विकास गावंडे, अधिव्याख्याता डॉ. दिपक चांदूरे, वर्षा मोरे, शाळा निरीक्षक वहीद खान व मो. जावेद, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकजकुमार सपकाळ, केंद्र समन्वयक नासीर हुसेन व मो. इमरान नबी, विषय साधनव्यक्ती काजी निजामुद्दीन, संजय बेलसरे, कु. शुभांगी सुने, कु. सुषमा दुधे व योगेश राणे यांनी विविध शाळांमध्ये भेटी देऊन शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली.

तसेच लोकप्रतिनिधींकडूनही मोठ्या उत्साहात शाळा भेटी घेण्यात आल्या. महापौर श्रीचंद तेजवानी, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवि राणा, उपमहापौर सचिन भेंडे, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, गटनेता नाना आमले, शेख हमीद शेख वाहेद, डॉ. राजेंद्र तायडे, झोन सभापती सौ. माधुरी ठाकरे, सौ. स्वाती कुलकर्णी, इस्माईल कासम लालुवाले, किशोर जाधव, शिक्षण समिती सभापती अँड. प्रीती रेवणे, उपसभापती सौ. वंदना मडघे, शहर सुधार समिती सभापती सौ. राधा कुरील, उपसभापती श्रीमती सुमती ढोके, महिला व बाल कल्याण समिती सभापती सौ. ममता आवारे, उपसभापती सौ. लता देशमुख, विधी समिती सभापती सौ. नेहा लुल्ला, उपसभापती डॉ. मधुरा काहाळे, यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिका शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प, मिठाई तसेच शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना नियमित शाळेत उपस्थित राहण्याचे, मन लावून शिक्षण घेण्याचे, स्वच्छता राखण्याचे तसेच शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले. शिक्षकांशी संवाद साधून अध्यापनाची तयारी, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, डिजिटल शिक्षण, वाचन संस्कृती आणि शाळेतील मूलभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला.

महानगरपालिका शिक्षण विभागाने तयार केलेल्या भेट नियोजनानुसार शहरातील मराठी, हिंदी, प्राथमिक, उच्च प्राथमिक, मुला-मुलींच्या तसेच माध्यमिक शाळांमध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत भेटी पार पडल्या. प्रत्येक अधिकाऱ्याला आणि लोकप्रतिनिधीला विशिष्ट शाळा व वेळ निश्चित करून देण्यात आली होती. त्यामुळे सर्व शाळांमध्ये प्रशासन व लोकप्रतिनिधींची उपस्थिती राहिली आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले. शिक्षण विभागाच्या या उपक्रमामुळे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महानगरपालिका शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे, पालकांचा विश्वास दृढ करणे आणि शाळांचा सर्वांगीण विकास साधणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात प्रशासन, लोकप्रतिनिधी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून प्रेरणादायी वातावरणात झाली असून, महानगरपालिका शाळांना अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित बनविण्याचा संकल्प यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित करण्यात आला.

# प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तातडीने सोडवा; खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे जलसंपदा विभागाला निर्देश

प्रतिनिधी १ जुलै



**अमरावती** : मोर्शी तालुक्यातील विविध सिंचन प्रकल्प आणि प्रकल्पग्रस्तांच्या प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या समस्या निकाली काढण्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे कमालीचे आक्रमक झाले आहेत. जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता टाले व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या आणि पुनर्वसनाच्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, सर्व समस्या तातडीने आणि युद्धपातळीवर सोडवण्याचे कडक निर्देश खासदार बोंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. बैठकीत प्रामुख्याने खालील मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून मार्ग काढण्याचे निर्देश देण्यात आले. मोर्शी तालुक्यातील खोपडा - बोडणा या गावांना विशेष बाब अंतर्गत सानुग्रह अनुदान मिळवून देणे.

खोपडा पुनर्वसन क्षेत्रात पात्र लाभार्थ्यांना तातडीने भूखंड वाटप करणे आणि पुनर्वसन मधील जनसुविधेची कामे वेळेत पूर्ण करणे. मोर्शी तालुक्यातील चारगड प्रकल्पावरील प्रलंबित विकासात्मक कामांना तातडीने मंजुरी देऊन ती पूर्ण करणे. निम्न चारगड प्रकल्प अंतर्गत मौजा बोडणा पुनर्वसनाची जागा मौजा येरला येथे उपलब्ध करून देणे. तसेच, निम्न चारगड प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या शेत रस्त्याऐवजी शेतकऱ्यांसाठी पर्यायी रस्ता तातडीने उपलब्ध करून देणे. अमरावती जिल्ह्यातील सन २०२५-२६ मध्ये मंजूर असलेल्या पूर संरक्षण भिंतीच्या कामांचा आढावा घेणे आणि इतर प्रस्तावित व झालेल्या कामांची सद्यस्थिती तपासणे इत्यादी विषयावर या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. 'प्रकल्पग्रस्तांनी धरणासाठी आणि विकासासाठी आपल्या जमिनी दिल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा आणि हक्काचा प्रश्न रेंगाळता कामा नये,' अशी आग्रही भूमिका खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी बैठकीत मांडली. प्रशासकीय पातळीवर कोणत्याही तांत्रिक त्रुटींमुळे कामे अडकणार नाहीत याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी मुख्य अभियंता टाले यांना दिल्या.

या महत्त्वपूर्ण बैठकीला जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसह परिसरातील प्रमुख नागरिक आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये मनोज चव्हाण, अजिंक्य लुंगे, सचिन गोमकाळे, सचिन वानखडे, प्रशांत पांडे, पंडित चव्हाण, प्रवीण नागदिवे, मोहित डरंगे, नितीन ठाकरे, मंगेश शिंदे, रमेश गोमकाळे, नरेश वाहने, गजानन भोंडे, योगेश बोहरुपी, नयन लुंगे, विजय उमाळे आणि मदन वाहने आदींचा समावेश होता.

# उद्या आ. रवी राणा यांच्या पुढाकाराने समितीची बैठक

प्रतिनिधी १ जुलै

**अमरावती** : अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती विधानभवन मुंबई व आमदार रवी राणा यांनी सतत पत्र व्यवहार व पाठपुरावा करून संत गाडगेबाबा समाधीस्थळ, अमरावती विकास आराखड्यासंदर्भात विकास निधी ची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली होती.आमदार रवी राणा यांच्या प्रयत्नांची दखल घेत. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार, दि. २ जुलै रोजी दुपारी २ वाजता विधानभवन, मुंबई येथील मंत्रिमंडळ सभागृहात शिखर समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. याबाबत नगर विकास विभागाच्या सह सचिव विद्या हम्पय्या यांनी संबंधित विभागांना बैठकीची सूचना जारी केली आहे.

बैठकीस वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव, राज्याचे पोलिस महासंचालक, नागपूर रेल्वे परिक्षेत्राचे महाव्यवस्थापक, विभागीय आयुक्त अमरावती, जिल्हाधिकारी तसेच अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त यांना माहितीसह उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# उप अधीक्षक अविनाश दशरथकर यांना भावपूर्ण निरोप



प्रतिनिधी १ जुलै

**अमरावती** : उपअधीक्षक अविनाश दशरथकर, चांदूर बाजार तथा अतिरिक्त पदभार मोर्शी यांनी नियत वयोमानानुसार मंगळवारी (दि. ३० जून) शासकीय सेवेतून सेवानिवृत्ती स्वीकारली. यानिमित्त आयोजित निरोप समारंभात अधिकारी, कर्मचारी व सहकाऱ्यांनी त्यांना भावपूर्ण निरोप देत त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला.

सेवाकाळात उपअधीक्षक अविनाश दशरथकर यांनी शांत, संयमी, प्रेमळ व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली. नियमांचा सखोल अभ्यास, कामातील सातत्य, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि प्रत्येक कर्मचाऱ्याला योग्य मार्गदर्शन ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये ठरली. त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपले व प्रत्येकाच्या अडचणी समजून घेत सहकार्य केले.

यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत, 'अविनाश दशरथकर सरांसारखा अधिकारी पुन्हा मिळणे कठीण आहे. त्यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि आत्मीयतेची वागणूक कायम स्मरणात राहील,' अशा भावना व्यक्त केल्या.

समारंभात त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, सुख, समाधान, दीर्घायुष्य व भरभराटीसाठी शुभेच्छा दिल्या.

# साडेचार वर्षांच्या बालीके वर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

प्रतिनिधी १ जुलै



**अमरावती** : विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी ) रुग्णालयामध्ये साडेचार वर्षांच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील पाचवी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत. सदर रुग्ण ही साडेचार वर्षांवरील असल्याने कुठल्याही योजने मध्ये बसत नसल्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधी ची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत केलेली आहे व शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी मध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पुढील एक वर्ष स्पीच थेरपी विनामूल्य करण्यात येणार आहे. या योजनेतून रुग्णाला दोन्ही योजनांच्या माध्यमातून शस्त्रक्रिया व स्पीच थेरपी याचा लाभ विनामूल्य मिळणार आहे. सदर रुग्ण ही रा. रासेगाव ता. अचलपूर जि. अमरावती येथील रहिवाशी असून जन्मतः ती ऐकण्यास अक्षम होती. रुग्ण दोन वर्षांची झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांना समजले की ती ऐकू शकत नाही . सुरुवातीला रुग्ण खाजगी रुग्णालयात उपचारासाठी गेले असता मात्र शस्त्रक्रियेचा खर्च जास्त असल्यामुळे रुग्णा सह नातेवाईक जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे आणले असता रुग्णालयात तपासणी केल्यानंतर रुग्णास सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलला शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. सूपर स्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व रुग्णास ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण मोरे यांच्याकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले व तदनंतर शेवटी २५ जुन २०२६ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रिये मधे पारंपारिक तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला.

# दर्यापूर शहरातील अव्यवस्थेवर शिवसेना आक्रमक

प्रतिनिधी १ जुलै

**दर्यापूर** : मंगळवार दिनांक ३० जून रोजी नगर परिषद कार्यालय दर्यापूर येथे आयोजित सर्वसाधारण मासिक आढावा सभा आयोजित केल्या गेली होती.

या सभेत नगराध्यक्ष, मुख्याधिकारी महोदय, जवळपास सर्व नगर सेवक व सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. या सभेमध्ये शिवसेना शिंदे गटाचे पक्ष नेते व नगर सेवक प्रदीप गोपालजी मलीये यांनी गावातील अनेक समस्यांवर आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी शहरातील सतत वाढत्या रोगराई साठी स्वच्छता व्यवस्था कमकुवत असल्याने आरोग्य विभागास जबाबदार धरले. संसर्गजन्य आजार हे सतत वाढत आहेत, तरी आरोग्य विभाग काय करत आहे, असा ज्वलंत प्रश्न जनतेला पडला आहे. यानंतर सर्व कचरा संकलन गाड्या नियमित सेवा देतील व कोणत्याही सार्वजयिक ठिकाणी कचरा राहणार नाही, असे तोंडी आश्वासन आरोग्य विभागाने दिले आहे. त्याचप्रमाणे शहरात जागोजागी पथ दीप बंद असल्याची तक्रार होत आहे. पावसाच्या पाण्यामुळे जमिनीत बिळात राहणारे साप, विंचू व किडे बाहेर पडले आहेत, तरी देखील महिलांना जीव मुठीत घेऊन अंधारात घराबाहेर पडावे लागते. असे असून देखील कोणतीही सकारात्मक कारवाई होत नसल्याने विद्युत विभागाला विचारणा केली. तत्काळ कारवाई न झाल्यास शिवसेना शिंदे गट, नगर विकास मंत्री महोदय आणि जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार केली जाईल. तसेच पुढील आठवड्यात कारवाई न दिसल्यास प्रथम पुष्पगुच्छ देऊन, त्यानंतर पुष्पहार देऊन सत्कार केला जाईल.तरी दखल घेतली गेली नाही, तर शिवसेना शिंदे गट आपल्या प्रचलित पद्धतीने कार्य करून घेण्यास समर्थआहे. हे लक्षात असू द्यावे, अशी सूचना सुद्धा केली आहे.

# तिवसा नगरपंचायतीचे 'नमो उद्यान' सज्ज; मेळघाट थीममुळे शहराला लाभणार नवी ओळख

## राज्य शासनाच्या 'नमो उद्यान' स्पर्धेत विभागीय स्तरावर अव्वल स्थान मिळविण्याचा निर्धार

प्रतिनिधी १ जुलै

**तिवसा** : महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी 'एक कोटीतून नमो उद्यान' या योजनेअंतर्गत तिवसा नगरपंचायतीने साकारलेले अत्याधुनिक 'नमो उद्यान' आता पूर्णत्वास आले असून लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. आधुनिक सुविधा, पर्यावरण संवर्धन, पर्यटन जनजागृती, आरोग्यदायी जीवनशैली आणि सांस्कृतिक वारशाचा संगम घडवून आणणारे हे उद्यान तिवसा शहराच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्रत्येक नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये किमान एक अत्याधुनिक नमो उद्यान विकसित करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, विभागीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायतींना अनुक्रमे ५ कोटी, ३ कोटी आणि २ कोटी रुपयांची विशेष बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. शासनाने निश्चित केलेल्या १०० गुणांच्या निकषांनुसार तिवसा नगरपंचायतीने या उद्यानाची उभारणी केली असून, विभागीय स्तरावरील स्पर्धेत अव्वल स्थान मिळविण्याचा निर्धार केला आहे.

या उद्यानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मा. श्री. आशिष येरेकर, जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेली 'मेळघाट थीम' होय. अमरावती जिल्ह्याचा नैसर्गिक वारसा असलेल्या मेळघाटातील समृद्ध जैवविविधता, दुर्मिळ वन्यजीव, विविध पक्षी, घनदाट अरण्य, सातपुडा पर्वतरांगांचे निसर्गवैभव आणि आदिवासी संस्कृती यांचे आकर्षक दर्शन या उद्यानातून घडते. उद्यानामध्ये उभारण्यात आलेली भित्तीचित्रे, शिल्पकला, माहिती फलक, नैसर्गिक दृश्यांची कलात्मक मांडणी आणि पर्यटनविषयक माहिती नागरिकांना मेळघाटच्या समृद्ध वारशाची ओळख करून देते. त्यामुळे हे उद्यान केवळ



मनोरंजनाचे केंद्र न राहता पर्यावरण शिक्षण, जैवविविधतेची माहिती आणि पर्यटन जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरणार आहे.

तिवसा नगरपंचायतीने नागरिकांच्या प्रत्येक वयोगटाचा विचार करून उद्यानामध्ये अत्याधुनिक सुविधा विकसित केल्या आहेत. आरोग्यप्रेमींसाठी आधुनिक ओपन जिम, चालणे व धावण्यासाठी आकर्षक जॉगिंग ट्रॅक, योग व ध्यानासाठी स्वतंत्र योगा स्पेस, लहान मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी सुरक्षित व आकर्षक झुले, घसरगुंडी आणि आधुनिक खेळणी, तर ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रशस्त व आरामदायी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय हिरवळ, आकर्षक उद्यानरचना, सुशोभीकरण, रंगीबेरंगी फुलझाडे, आकर्षक विद्युत रोषणाई, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, कचराव्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था आणि स्वच्छतेच्या सर्व निकषांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

हे उद्यान शहरातील नागरिकांना केवळ विरंगुळा देणारे ठिकाण नसून निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारे, कुटुंबासह वेळ घालविण्यासाठी सुरक्षित व सुंदर वातावरण उपलब्ध करून देणारे आणि मुलांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणारे केंद्र ठरणार आहे. विशेष म्हणजे मेळघाट थीममुळे अमरावती जिल्ह्याच्या पर्यटनाला चालना मिळण्यासही मदत होणार असून, तिवसा शहराला पर्यटन नकाशावर एक वेगळी ओळख मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरातील सार्वजनिक जागांचा प्रभावी वापर करून पर्यावरणपूरक विकास साधणे, हरित क्षेत्र वाढविणे, नागरिकांना आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देणे आणि आधुनिक शहर विकासाच्या संकल्पनेला मूर्त रूप देणे, या सर्व बाबींचा उत्कृष्ट समन्वय या नमो उद्यानात पाहायला मिळतो. त्यामुळे हे उद्यान तिवसा नगरपंचायतीच्या विकासाभिमुख, लोकाभिमुख आणि दूरदृष्टीच्या नियोजनाचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे. राज्य शासनाच्या 'नमो उद्यान' स्पर्धेतील सर्व निकषांची पूर्तता करत तिवसा नगरपंचायतीने गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण उद्यान उभारले आहे. मेळघाट थीम, आधुनिक सुविधा, पर्यावरणपूरक नियोजन, पर्यटन जनजागृती, स्वच्छता आणि नागरिकाभिमुख दृष्टिकोन या सर्व बाबींच्या बळावर विभागीय स्तरावरील स्पर्धेत तिवसा नगरपंचायतीचे 'नमो उद्यान' निश्चितच प्रभावी दावेदार ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

लवकरच हे उद्यान सर्व नागरिकांसाठी खुले करण्यात येणार असून, तिवसा शहराच्या विकासात हा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. उद्यानाचा लाभ घेताना परिसराची स्वच्छता राखणे, वृक्षांचे संरक्षण करणे, सार्वजनिक मालमत्तेची जपणूक करणे आणि पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग नोंदविणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे आवाहन नगरपंचायत तिवसाचे मुख्याधिकारी शिवदास मुसळे तसेच नगराध्यक्षा सौ. प्रतिभा गौरखेडे यांनी केले आहे. तिवसा नगरपंचायतीच्या पुढाकारातून साकारलेले 'नमो उद्यान' हे केवळ एक उद्यान नसून तिवसा शहराच्या प्रगत, हरित, पर्यावरणपूरक आणि लोकाभिमुख विकासाची नवी ओळख ठरणार आहे.

# फोकस

• अतिष देशमुख @ वाशीम •




• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले. शहरातून जाणारा अकोला - नांदेड रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरीच होत आहे. जिल्ह्यात एमआयडीसी भकास झाली असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे. जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून असलेला कलंक पुसण्यासाठी आलेला निधीही भ्रष्टअधिकाऱ्यांमुळेच खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. लोकप्रतिनिधींनीही काहीच केले नाही .

# कधी मिळणार न्याय जिल्ह्यावर अन्याय !



* रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी
* भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर
* अमरावती विद्यापिठ उपकेंद्राची लढाई व्यर्थ
* नदीजोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळला




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे. विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.




# जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर...

मागास जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. याविरोधात जिल्ह्यातील आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी दिखावा म्हणुन तीव्र विरोध केला. तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उद्‌घाटन संपन्न झाले. आता साप गेल्या नंतर काडया मारण्यात काय अर्थ अशी चर्चा होत आहे. खुदद नितिन गडकरींनीही जिल्हयातील अधिका-यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेमुळे व लोकप्रतिनिधीच्या निष्क्रीये ते मुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा जाहिर सभेत म्हटले आहे.

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये




वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक असून आमदार, खासदार आजी माजी हे नेते पुढे आले. त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे माध्यमांना सांगितले होते. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्‌घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनाही तात्पूर्ते आंदोलन करून विरोध दर्शविला. मात्र, त्यामधून काही मार्ग निघाला नाही.

# सिंचनाचा भ्रष्टाचार निवळला, नदीजोड प्रकल्पातून जिल्हा वगळला...




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द



प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश होता मात्र, ६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात वाशिम जिल्ह्याचा उल्लेख नाही. त्यामुळे आकांक्षीत जिल्ह्याचा डाग पुसण्याच्या बाता करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे गेले.




## अमरावती विद्यापिठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे कायम...

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ५(८)अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक नियोजनासाठी उपकेंद्र उभारणे बंधनकार आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्‌यापीठाच्या स्थापनेला ३९ वर्षे होऊनसुद्धा विद्यापीठ प्रशासनाने आपले उपकेंद्र सुरू केले नाही. दरम्यान, वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या सिनेट सभेमध्ये झाला होता. त्याला उच्च व तंत्र शिक्षण विभागानेसुद्धा तत्वतः मान्यतही दिली होती. लोकप्रतिनिधींनी या संबंधि पुढाकारही घेतला होता. मात्र घोडे कुठे आडले तरी सुध्दा उपकेंद्राचा प्रश्न अद्यापही कायमच आहे. लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी उपकेंद्रासाठी उभी केलेली चळवळ थंडबस्त्यात पडली आहे.




## वाशीम येथे विद्यापिठ उपकेंद्राला तत्वत: मान्यता मिळाली होती...

वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, याला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून १ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शिवाय उपकेंद्रासाठी १७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, ६० कोटींचा खर्च अपेक्षित आहे हे सुद्धा यात ठरले. हा प्रस्ताव वित्त व संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला. १५ वर्षांपासून तो रेंगाळला आहे. दरम्यान, बांधकामाच्या साहित्याचे भाव आणि कर्मचाऱ्यांचे पगारही वाढले. त्यामुळे आता हा खर्च ३०० कोटींपेक्षाही अधिक होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रखडला आहे. तर दुसरीकडे विद्यापिठ उपकेंद्र अकोल्याला होणार असल्याने पुन्हा एकदा वाशीम जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. तरी सुध्दा उपकेंद्रासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना निद्रावस्थेत असून त्यांना जिल्ह्याच्या विकासाचे काहीच घेणे देणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. १ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मलकापूर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

३ अट्टल चोर गजाआड, गुन्हेगारीवर वचक
३ लाख ९० हजारांच्या मुद्देमालासह ४ मोटारसायकली जप्त; पोलीस पथकाचे सर्वत्र कौतुक

प्रतिनिधी १ जुलै

**मलकापुर :** शहरातील चोऱ्यांच्या घटनांचा छडा लावण्यासाठी मलकापूर शहर पोलिसांनी अत्यंत वेगवान आणि कौतुकास्पद कारवाई केली आहे. एका चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी अवघ्या काही तासांत ३ अट्टल आरोपींना बेड्या ठोकून त्यांच्याकडून तब्बल ३ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी दाखवलेली ही तत्परता आणि यशस्वी कामगिरीमुळे नागरिकांमधून पोलीस प्रशासनाचे मोठे कौतुक होत आहे.

मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे दि. २७/०६/२०२६ रोजी अपराध क्र. ४७४/२०२६ भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तदनंतर मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गिरी यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्याकामी सदर तक्रारदार यांच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन तात्काळ गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रमुख पो.उप.नि. शुभम बरदाडे व




डिबी पथक यांना सदर गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करून त्यांचा तात्काळ शोध घेण्याचा सूचना दिल्याने सदर गुन्ह्यातील तक्रारदार यांच्या दुकानातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरेची तपासणी केली असता त्यामध्ये ०२ अज्ञात इसम समान चोरून घेवून जात असल्याचे दिसून आल्याने डी.बी. पथकाने पो.नि. गणेश गिरी यांचे मार्गदर्शनाखाली शोध घेण्यास सुरुवात करुन डी.बी. पथकाने त्यांचे गोपनीय बातमीदार यांना सक्रीय करुन मलकापूर शहरातुन सदर गुन्ह्यातील ०३ आरोपी शेख साबीर शेख अहमद वय ३२ वर्ष, जावेद खान मुसा खान वय ३८ वर्ष दोन्ही रा. सायकलपुरा, मो. सोहील मो. रफीक वय २९ वर्ष रा. पंत नगर मलकापूर यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सदर गुन्ह्याच्या तपासाच्या दृष्टीने कसुन चौकशी केली असता त्यांच्या कडून पोलीस स्टेशन मलकापूर शहर येथील विविध गुन्ह्यात चोरी केलेला: हाऊस वायर कि अं १,००,०००/- रुपये, कृषी साहीत्य कि अं ५०,०००/- रुपये, प्लंबिंग साहीत्य कि अं ६०,०००/- रुपये, महावितरण कंपनीचे केबल अंदाजे ६०,०००/- रुपये, चार मोटारसायकल कि अं १,३०,०००/- रुपये असा एकुण ३,९०,०००/- रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास पोलीस स्टेशन मलकापूर शहर करीत आहेत. सदरची कार्यवाही व तपास निलेश तांबे पोलीस अधीक्षक बुलढाणा, पियुष जगतापअप्पर पोलीस अधीक्षक खामगांव, सोहन माछरे उपविभागीय पोलीस अधिकारी मलकापूर व पो.नि गणेश गिरी मलकापूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे डिबी पथकाचे पो.उप.नि. शुभम बरदाडे, पोकॉ आसिफ शेख, पोकॉ संतोष कुमावत, पोकॉ प्रविण गवई, पोकॉ योगेश तायडे, पोकॉ गणेश बरडे, पोकॉ दिपक सोनोने, पोकॉ नवल राठोड, मपोकॉ मिनल शिंदे तसेच पोस्टेचे होमगार्ड सह आदिंनी केली आहे.

# 'जलयुक्त, समृद्ध महाराष्ट्र' संकल्पनेला बुलढाण्यात बळ

♦ टाटा ट्रस्ट-मानवलोकच्या उपक्रमातून शाश्वत शेतीला चालना

प्रतिनिधी १ जुलै

**बुलढाणा :** राज्यातील जलसंधारण, मृदसंवर्धन आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धोरणांना बुलढाणा जिल्ह्यात प्रत्यक्ष कृतीची जोड मिळत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यात जलसंपदा संवर्धन, हवामान बदलाला तोंड देणारी शेती आणि ग्रामीण विकासाला दिलेल्या प्राधान्यानुसार टाटा ट्रस्ट आणि मानवलोक यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेला 'इंटिग्रेटेड सॉईल अँड वॉटर रिसोर्सेस मॅनेजमेंट (ऐंश)' प्रकल्प जिल्ह्यातील चिखली व बुलढाणा तालुक्यात ग्रामीण परिवर्तनाचा नवा आदर्श ठरत आहे.

५ वर्षांच्या या प्रकल्पाची अंमलबजावणी ४० गावांमध्ये सुरू असून सुमारे २७ हजार कुटुंबांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभमिळण्याची अपेक्षा आहे. पाणी अडविणे, भूजल पातळी वाढविणे, मृदसंवर्धन, शेतीची उत्पादकता वाढविणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातत्याने मांडलेल्या 'पाणी हेच समृद्धीचे मूळ' या विचाराशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या प्रकल्पांतर्गत १० गावांमध्ये १५ चेकडॅममधील गाळ काढण्याची कामे, १२ कॉम्पोझिट गॅबियन संरचना, २०० जलतारा, २०० एकर क्षेत्रावर कंटूर बंडिंग आणि किलोमीटर नदी खोलीकरणाची कामे सुरूआहेत. या कामांमुळे पावसाचे पाणी अधिक प्रमाणात जमिनीत मुरून भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार असून सिंचनाची उपलब्धता सुधारेल.

प्रकल्पाच्या प्रभावी २० अंमलबजावणीसाठी समुदाय संसाधन व्यक्ती (ऐंड़) नियुक्त करण्यात आल्या आहेत. सर्व ४० गावांमध्ये ग्राम विकास समित्यांची स्थापना पूर्ण झाली असून ३६ ग्रामपंचायतींची ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत. बेसलाईन सर्वेक्षणासह विविध शासकीय विभागांशी समन्वयाचे कामही सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शाश्वत कृषी विकासाच्या दृष्टीकोनानुसार वैज्ञानिक शेतीलाही प्राधान्य देण्यात आले आहे. आतापर्यंत ३०० शेतकऱ्यांची माती परीक्षणे करण्यात आली असून त्यानुसार पीक नियोजन आणि पोषण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन दिले जात आहे. जलसंधारणासोबतच क्षमता विकास, जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनावरही भर दिला जात आहे. या प्रकल्पामुळे पुढील पाच वर्षांत शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नात सुमारे २५ टक्के वाढ, मातीची धूप ५० टक्क्यांपर्यंत कमी होणे, भूजल पातळीत वाढ, रब्बी हंगामातील लागवड क्षेत्र विस्तार आणि ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. राज्य शासनाच्या जलसंवर्धन आणि शाश्वत ग्रामीण विकासाच्या धोरणांना पूरक ठरणारा हा उपक्रम बुलढाणा जिल्ह्यात जल, मृदा आणि शेती व्यवस्थापनाचा प्रभावी नमुना ठरत असून, लोकसहभागाच्या ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# पिंपळगाव राजातील ग्राहकाविरुद्ध वीजचोरीचा गुन्हा

प्रतिनिधी १ जुलै

**खामगाव :** महावितरणच्या अकोला परिमंडळातील भरारी पथकाने पिंपळगाव राजा येथे केलेल्या तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर विजेचा अनधिकृत वापर झाल्याचे निदर्शनास आले. संबंधित ग्राहकाविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा, २००३ च्या कलम १३५ अन्वये सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी महावितरणचे सहायक अभियंता तथा भरारी पथकातील विजय हरी सानप (४२) यांनी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, १५ जून रोजी दुपारी १२.१५ वाजता पिंपळगाव राजा येथील आमिर खान शब्बिर अहमद खान (४५) यांच्या वीजजोडणीची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान संबंधित ठिकाणी बसविण्यात आलेल्या एका कंपनीच्या सिंगल फेज २००/५ अँपिअर क्षमतेच्या मीटर (क्रमांक ६८६८५९०) संदर्भातील तांत्रिक पडताळणीत अनियमितता आढळून आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले . महावितरणच्या अहवालानुसार, संबंधित ग्राहकाने मागील सुमारे तीन महिन्यांच्या कालावधीत ९५,३९१ युनिट वीजेचा अनधिकृत वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथित विजचोरीमुळे महावितरणचे १९ लाख २२ हजार ९१० रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला असून, नियमानुसार आकारण्यात आलेली २० लाख रुपयांची तडजोड रक्कम तसेच इतर देयके मिळून ३९ लाख २३ हजार ८२७ रुपयांचा भरणा संबंधित ग्राहकाने न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा कोलवड येथून शुभारंभ

## जिल्ह्यात 2.30 लाख बालकांना पोलिओ डोजचे उद्दिष्ट

प्रतिनिधी १ जुलै

**बुलढाणा :** पोलिओमुक्त भारताचा दर्जा कायम राखण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ रविवार २८ जून रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र

हतेडी अंतर्गत उपकेंद्र कोलवड येथे उत्साहात झाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते ५ वर्षाखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते, वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण जवंजाळ, डीईएमओ राजेश धुताडमल, समुदाय आरोग्य अधिकारी, गावाच्या सरपंच सौ. मीराताई पवार, उपसरपंच चंद्रभागाताई पाटील, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी तसेच लाभार्थी पालक मोठ्या



संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील ० ते ५ वर्ष वयोगटातील २ लाख ३० हजार ४०१ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी जिल्हाभरात २ हजार ६९ लसीकरण बूथ उभारण्यात आले असून मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि स्वयंसेवक कार्यरत आहेत. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी पालकांना आवाहन करताना सांगितले की, पाच वर्षाखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब पाजणे ही पालकांची जबाबदारी असून कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. उपस्थित मान्यवरांनीही पालकांनी आपल्या बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून राष्ट्रीय मोहिमेला यशस्वी करण्याचे आवाहन केले.

# पेरणीच्या हक्कावरून शेतात राडा; लोखंडी अवजाराने हल्ला

प्रतिनिधी १ जुलै

**खामगाव :** तालुक्यातील चिखली खुर्द परिसरात शेतीच्या पेरणीच्या हक्कावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाण, धमक्या आणि खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या आरोपांपर्यंत पोहोचले. या प्रकरणी सात नामनिर्देशित आरोपींसह चार अनोळखी व्यक्तींविरुद्ध जलंब पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी चिखली खुर्द येथील शेतकरी मोहन पाडसिंग लाहुडकर (४३) यांनी जलंब पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादीनुसार, २९ जून रोजी दुपारी सुमारे १२ वाजता ग्राम लांजूड भाग-१ येथील गट क्रमांक ३१९ मधील त्यांच्या बहिणीच्या ताब्यात असलेल्या शेतात फिर्यादी, त्यांचा भाऊ आणि भाचा महेश रवींद्र वक्टे हे पेरणीचे काम करीत असताना आरोपींनी संगनमताने तेथे येऊन पेरणी करण्यास विरोध केला. पेरणीच्या कारणावरून झालेल्या वादात आरोपी वैभव पुरुषोत्तम लाहुडकर याने लोखंडी अवजाराने महेश वक्टे यांच्या डोक्याच्या डाव्या कानाजवळ वार करून गंभीर दुखापत केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. जखमीवर वैद्यकीय उपचार करण्यात आले असून, त्याच्या वैद्यकीय अहवालाच्या आधारे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच आरोपी संगिता पुरुषोत्तम लाहुडकर यांनी फिर्यादीला विनयभंगाच्या खोट्या प्रकरणात अडकविण्याची धमकी दिल्याचा आरोपही फिर्यादीत नमूद करण्यात आला आहे. याशिवाय इतर आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांना लोटपाट करून शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचेही म्हटले आहे. या प्रकरणी संगिता पुरुषोत्तम लाहुडकर, वैभव पुरुषोत्तम लाहुडकर, विष्णू शेजोळे, शिवाजी शेजोळे, विठ्ठल शेजोळे, जयंत वामन वक्टे तसेच चार अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १९१(२), १९१(३), ११८ (१), ११५ (२) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ढोल–ताशांच्या गजरात ज्ञानमंदिरात पहिलं पाऊल!

प्रतिनिधी १ जुलै

**खामगाव :** उन्हाळ्याच्या तब्बल दोन महिन्यांच्या सुटीनंतर ३० जूनपासून तालुक्यातील शाळांमध्ये पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने परिसर दुमदुमून गेला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. खामगाव तालुक्यातील पिंप्री गवळी येथील जिल्हा परिषद शाळेत नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. शाळेत प्रथमच प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांच्या स्वागतासाठी गावातून ढोल-ताशांच्या गजरात आनंदमय मिरवणूक काढण्यात आली. नव्या गणवेशातील विद्यार्थ्यांमध्ये शाळेत जाण्याचा उत्साह ओसंडून वाहत होता. काही चिमुकल्यांना आकर्षक पद्धतीने सजविलेल्या बैलगाडीत बसवून गावातून मिरवणूक काढण्यात आली.




### विद्यार्थी चक्क उंटावर बसून शाळेत!

मुलींच्या शिक्षणाबाबत समाजात सकारात्मक जनजागृती व्हावी, या उद्देशाने खामगावातील रवी जोशी यांनी यंदाही अनोखा उपक्रम राबविला. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी कन्या शिप्रा हिला उंटावर बसवून लॉयन्स ज्ञानपीठ शाळेत नेले. आगळयावेगळया उपक्रमामुळे शहरातील नागरिकांचे लक्ष वेधले गेले असून, सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. मंगळवारी (दि. ३०) नवीन शैक्षणिक सत्राला सुरुवात या झाली. सराफा परिसरातील रहिवासी रवी जोशी यांची कन्या शिप्रा हिने पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करून सहावीत प्रवेश घेतला. या आनंदाच्या क्षणाचे औचित्य साधत तिचे पारंपरिक औक्षण करण्यात आले. त्यानंतर उंटावरून तिची शाळेपर्यंत प्रतीकात्मक मिरवणूक काढण्यात आली.

### ठरली आकर्षणाचे केंद्र

शाळेत प्रथमच प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांना पारंपरिक पद्धतीने सजविलेल्या बैलगाडीतून गावभर फिरविण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, फुलांची उधळण आणि गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे ही मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली.

### औक्षण, पुष्पगुच्छ आणि खाऊ देऊन स्वागत

मिरवणुकीनंतर शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पुष्पगुच्छ, फुले व खाऊ देत शाळेत प्रवेश देण्यात आला.शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले.

### शिक्षणाचा सकारात्मक संदेश

पहिल्याच दिवशी पिंप्री गवळी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे आनंददायी वातावरणात स्वागत केल्याने त्यांच्यात शाळेविषयी आत्मीयता आणि शिक्षणाविषयी गोडी निर्माण होते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची शाळेची भीती कमी होण्यास मदत होते तसेच पालक व शाळेतील सुसंवाद अधिक दृढ होतो. या उपक्रमाकरीता शाळेतील शिक्षकांनी पुढाकार घेतला.

# वडोदा येथील उर्दू प्राथमिक शाळेला शिक्षकाच्या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) चा शाळेच्या प्रवेशोत्सवाच्या दिवशीच 'ताला ठोको'

प्रतिनिधी १ जुलै

**मलकापुर :** तालुक्यातील वडोदा येथील उर्दू प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी वर्ग असून या वर्गात एकूण ४१ मुले शिक्षण घेत आहे. या प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या दोन जागा मंजूर असून दोन वर्षांपूर्वी एका शिक्षकाने सेवेच्छा सेवानिवृत्ती घेतल्याने आता एकच शिक्षक असल्याने अतिरिक्त ताण पडत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत शाळा व्यवस्थापन समिती, गावकऱ्यांनी वेळोवेळी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्याकडे पत्रव्यवहार केला दोन वर्षे उलटून अद्यापही शिक्षकाची नियुक्ती झाली नसल्याने ग्रामस्थांनी याबाबतची माहिती शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना दिली.गजानन ठोसर यांच्या सह ग्रामस्थ व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी गटशिक्षणाधिकारी फाळके यांना निवेदन देऊन ३० जून रोजी पर्याय शिक्षकाची व्यवस्था करा अन्यथा शाळा प्रवेशोत्सवाच्या दिवशी शाळेला ताला ठोकोचा इशारा दिला होता.एका शिक्षकावर ताण येत असून एकाच वर्गात पहीली ते पाचवी विद्यार्थी बसून होत असलेल्या एकत्रित शिक्षणाने मुलांचे भविष्य अंधारात जात असल्यामुळे शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना उपशहर प्रमुख



शकील जमादार, सत्तार शाह, रफीकभाई,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजीक खान मोहम्मद खान सह आदिंनी उर्दू शाळेला आज दि.३० जून २६ रोजी शाळा सुरू होण्याच्या प्रवेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी 'शाळेला ताला ठोको' आंदोलन केले.शाळेला ताला ठोको आंदोलन केल्याची माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी गटशिक्षणाधिकारी फाळके यांना भ्रमणध्वनीवरून दिली, आठ दिवसात वडोदा येथील उर्दू शाळेवर कायमस्वरूपी शिक्षक देण्याचे फाळके यांनी सांगितले, यावेळी गजानन ठोसर यांनी आठ दिवसात पर्यायी शिक्षक न मिळाल्यास बुधवार दि. ८ जुलै २६ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्या कार्यालयातच या विद्यार्थ्यांची शाळा भरविली जाणार असल्याचा इशारा दिला. ताला ठोको आंदोलनावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना उपशहरप्रमुख शकील जमादार,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजीकखान मोहम्मद खान, शिवसेना विभागप्रमुख सत्तार शाह, शाखाप्रमुख रफीकभाई पजायेवाले, पत्रकार सदानंद मोरे, पत्रकार ईलीयाज, शेख फिरोज शेख बबलू, शेख मुसा शेख सबदर, शेख अनीस शेख रशीद, शेख इसुब शेख मुसा, सै.बेग अजीज बेग, दाऊद खान चॉद खान, शे. वसीम शे.चांद, शे.जमील शे. जलील, शे. आसिफ शे नजीर सह आदिंची उपस्थिती होती.

# अटल पेन्शन योजना जनजागृती दिन

प्रतिनिधी १ जुलै

**बुलढाणा :** केंद्र शासनाच्या अटल पेन्शन योजना जनजागृती दिनानिमित्त १ जुलै २०२६ रोजी जिल्हाभर विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम पेन्शन फंड नियामक व विकास प्राधिकरण (इईॲ) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व बँका, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक, बँक प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचा सहभाग राहणार आहे.

असंघटित क्षेत्रातील नागरिकांना वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षितता मिळावी, या उद्देशाने अटल पेन्शन योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. याअंतर्गत १ जुलै रोजी जिल्ह्यात १० हजार लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. अटल पेन्शन योजना ही राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (ऱ्इए) अंतर्गत कार्यरत असून तिचे संचालन इईॲ मार्फत केले जाते. ही योजना शेतकरी, फेरीवाले, छोट्या व्यावसायिक, महिला, हमाल, वाहनचालक, बांधकाम मजूर तसेच इतर असंघटित क्षेत्रातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. योजनेअंतर्गत १८ ते ४० वर्ष वयोगटातील नागरिकांना सहभागी होता येते. नियमित मासिक हप्ते भरल्यानंतर वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर दरमहा १ ते ५ हजार पर्यंत निश्चित पेन्शन मिळण्याची तरतूद आहे.

# पाटबंधारे उपविभाग खामगावचे लाभधारकांना आवाहन

पाटचाऱ्या दुरुस्त करून पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा सुनिश्चित करावा

प्रतिनिधी १ जुलै

**खामगाव :** पाटबंधारे उपविभाग, खामगाव अंतर्गत मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व लाभधारक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पाटचाऱ्या मंजूर काटछेदानुसार तातडीने खोदून व दुरुस्त करून घ्याव्यात, असे आवाहन उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, खामगाव यांनी केले आहे. पावसाळ्यातील अतिरिक्त पावसाचे पाणी सुरळीतपणे नदी व नाल्यांमध्ये वाहून जाण्यासाठी पाटचाऱ्या योग्य स्थितीत असणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतामध्ये पाणी साचणार नाही तसेच पिकांचे नुकसान टाळण्यास मदत होईल.

पाटचाऱ्या दुरुस्त न केल्यामुळे पावसाचे पाणी शेतात साचून कोणत्याही कास्तकाराच्या शेतीचे अथवा पिकांचे नुकसान झाल्यास त्यास पाटबंधारे विभाग जबाबदार राहणार नाही. तसेच अशा परिस्थितीत पाटबंधारे विभागामार्फत कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई देण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व लाभधारक शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतातील पाटचाऱ्या तातडीने खोदून व दुरुस्त करून पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी पावसाळ्याच्या काळात आवश्यक ती दक्षता घ्यावी व सतर्क राहावे, असेही पाटबंधारे उपविभाग, खामगाव यांच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे.

एकच लक्ष्य शहरे स्वच्छ | स्वच्छ सर्वेक्षण 2026 | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | कचरा मुक्त शहरे | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# नगर परिषद,रिसोड जि.वाशिम



मा.श्री नरेंद्र मोदी
पंतप्रधान



मा.श्री देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

माझी वसुंधरा
#majhivasundhara

## माझी वसुंधरा... पर्यावरण संवर्धनाचे नवे पर्व...!



मा.श्री एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री



मा.श्रीमती सुनेत्रा पवार
उपमुख्यमंत्री

## एकच ध्यास ठेवूया, सिंगल युज प्लास्टिक हटवूया, समृद्ध पर्यावरणाचे रक्षण करुया!

**कोणतेही सिंगल युज प्लास्टिकचे उत्पादन, वापर व वितरणावर कायद्यान्वये बंदी आहे, बंदी असलेल्या या वस्तूंची वापर करु नये**

महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८ तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दि.१२ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार एकल वापर प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरणविक्री आणि वापरावर बंदी आहे.

**सिंगल युज प्लास्टिकचे उत्पादन, वापर व वितरण करताना आढळल्यास
पहिल्या गुन्ह्यासाठी ५ हजार
दुसऱ्या गुन्ह्यासाठी १० हजार
तिसऱ्या गुन्ह्यासाठी २५ हजार
व तीन महिने कैद होवू शकते**

## बंदी असलेले घटक

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सजावटीसाठी प्लास्टीक व पॉलिस्टीरिन (थर्माकोल) | सर्व प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स, नॉन ओवन बॅग्ससह हॅण्डल असलेल्या व नसलेल्या) | मिठाईचे बॉक्स, आमंत्रण कार्ड व सिगारेटची पाकिटे यांची प्लास्टिक आवरणे | १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे पीव्हीसी बॅनर्स | प्लास्टीकच्या काड्यांसह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लास्टिकच्या काड्या प्लास्टिकचे झेंडे, कँडी काड्या | आईस्क्रिम कांड्या | प्लेट्स, कप, ग्लासेस, कटलरी, जसे काटे, चमचे चाकु, पिण्यासाठीचे स्ट्रॉ, ट्रे, ढवळण्या (स्टिरर्स) | कंपोस्टेबल प्लास्टिक (कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून) | डिश, बाऊल, कॅन्टेनर (डबे) |

प्लास्टिक लेपित (Coating) तसेच प्लास्टिक थर (Laminated) असणाऱ्या पेपर / ॲल्युमिनियम इत्यादीपासुन बनविलेल्या डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटे, वाडगा, कंटेनर, इत्यादी एकल वापर उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे

स्वच्छ रिसोड, सुंदर रिसोड, हरित रिसोडचा ध्यास ठेवूया... प्लास्टिक पिशवी हटवूया, समृद्ध पर्यावरणाचे रक्षण करुया!

**भगवानराव क्षिरसागर**
अध्यक्ष नगर परिषद, रिसोड

**विष्णु कदम**
उपाध्यक्ष नगर परिषद, रिसोड

**सतिषजी शेवदा**
मुख्याधिकारी नगर परिषद, रिसोड

**सर्व सभापती व नगर परिषद सदस्य**

सिटी न्यूज सुपरफास्ट
वर्धापन दिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!

# नगर परिषद रिसोड जि. वाशिम

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला- ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135